रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १६१
www.ramprahar.com

शुक्रवार, २७ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन



**नवी दिल्ली :** देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे गुरुवारी (दि. २६) निधन झाले. श्वासोश्वास घेण्यासाठी त्रास होत असल्याने त्यांना दिल्लीच्या एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वयाच्या ९२व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी पाकिस्तानमधील गाह या गावी झाला. १९४७ साली फाळणीदरम्यान विस्थापित होऊन सिंग कुटुंब भारतात आले. पंजाब विद्यापीठातून त्यांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतले, तर ऑक्सफर्ड विद्यापीठातून अर्थशास्त्रात डॉक्टरेट केली होती. सन २००४ साली ज्या वेळी यूपीए सरकारने बहुमत गाठले त्या वेळी डॉ. सिंग पहिल्यांदा पंतप्रधान बनले. सलग दहा वर्ष ते पंतप्रधान होते. प्रकृतीच्या कारणास्तव गेल्या काही वर्षांपासून राजकारणापासून ते दूर होते. त्यांच्या निधनानंतर शोक व्यक्त होत आहे.

### अंतरंग

वनमंत्री गणेश नाईक यांनी पदभार स्वीकारला/२

'सुधागडच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध'/५

अलिबाग तालुका अजिंक्यपद कुस्ती निवड चाचणी स्पर्धा/८

# मुख्यमंत्री फडणवीस ॲक्शन मोडवर

## ■ 100 दिवसांचा कार्यक्रम सादर करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडवर आले आहेत. प्रत्येक विभागाला १०० दिवसांचा कार्यक्रम सादर करा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत तसेच पारदर्शकता, गतिशीलता आणि प्रामाणिकता यावर अधिक भर द्या, असेही म्हटले आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे गुरुवारी (दि. २६) उच्च व तंत्र शिक्षण, वन व कृषी विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. बैठकीस मुख्य सचिव



सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, वित्त विभागाच्या सचिव शैला ए आदी उपस्थित होते. या वेळी संबंधित विभागाच्या सचिवांनी आराखड्यांचे सादरीकरण केले.

महाराष्ट्र हे असिमित ताकदीचे राज्य नंबर १वर आहे म्हणून थांबू नका. जुनी पुण्याई असली तरी नवी पुण्याई पुन्हा मिळवली पाहिजे. तंत्रज्ञानाचा महत्तम वापर करा. सर्व अडचणी दूर करा. १०० दिवसांचा कार्यक्रम प्रत्येक विभागाने सादर करा. केंद्र सरकारचा पुरेपूर वापर राज्याच्या प्रगतीसाठी करून घ्या, अधिक समन्वय व पाठपुराव्याची व्यवस्था निर्माण करा. यासाठी दिल्ली येथे महाराष्ट्र सदनाच्या माध्यमातून स्वतंत्र कक्ष उभारा, असे मुख्यमंत्री फडणवीसांनी सूचित केले.

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केली पनवेल, खोपोली बसस्थानकांची पाहणी



**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर बसस्थानकांना भेटी देण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी गुरुवारी (दि. २६) पनवेल आणि खोपोली बसस्थानकाची पाहणी करून आढावा घेतला.

पनवेल येथील बससेवा, कर्मचाऱ्यांच्या सुविधा आणि व्यवस्थापनाचा परिवहनमंत्र्यांनी सखोल आढावा घेतला. स्वच्छतागृह, सर्वसामान्य प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा आणि महिला विश्रांती कक्षाच्या दर्जा उंचावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना त्यांनी दिल्या. विद्यार्थ्यांशी संवाद साधून बस वेळेवर उपलब्ध नसल्यामुळे येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या आणि या समस्येवर त्वरित उपाययोजना राबवण्याचे आश्वासन दिले.

यानंतर परिवहनमंत्र्यांनी पनवेल ते खोपोली असा बस प्रवास करत प्रवाशांसोबत संवाद साधला आणि खोपोली बसस्थानकाचा आढावा घेत परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अधिकची माहितीदेखील त्यांनी घेतली.

## संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या -मंत्री धनंजय मुंडे



**मुंबई : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर विरोधक वाल्मिक कराड यांचे नाव घेत मंत्री धनंजय मुंडे यांना लक्ष्य करीत आहेत. या पार्श्वभूमीवर मंत्री मुंडे यांनी या प्रकरणातील आरोपींना फाशी द्यावी, असे म्हटले आहे. याचबरोबर या प्रकरणात माझ्या जवळचा कोणी असेल तर त्यालाही सोडून नका, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री धनंजय मुंडे यांची गुरुवारी (दि. २६) भेट झाली. या भेटीनंतर ना. मुंडे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, जिथे माझी बैठक होती तिथेच मुख्यमंत्र्यांचीही बैठक होती. त्या वेळी योगायोगाने आमची भेट झाली. ज्या देशमुखांची हत्या झाली आणि ज्यांनी कोणी हे केले ते फासावर जायला पाहिजेत या मताचा मी आहे. ते शेवटी माझ्या जिल्ह्यातील एक सरपंच होते. मलाही त्यांच्या बाबतीत तेवढाच आदर आहे. जे कोणी गुन्हेगार आहेत, त्या सर्वांना फाशीची शिक्षा करा. मग तो कोणाच्याही जवळचा असो. अगदी माझ्या जवळचा असेल तर त्यालाही सोडायचे नाही.

# शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीचे नाव साता समुद्रापार पोहचले

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमी नाव हे साता समुद्रापार पोहचले असून या सुसज्ज अशा मैदानावर नुकताच दक्षिण आफ्रिकेतील संघाविरुद्ध अहिल्यानगर क्रिकेट संघाचा सामना रंगला. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत माझ्या गावात क्रिकेटनगरी उभी राहत असल्याचा मला अभिमान आहे, असे गौरवोद्गार काढले तसेच खेळाडूंसोबत संवाद साधून सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

गावातील खेळाडूंमधील क्रीडाकौशल्य वाढावे यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर हे नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांच्या संकल्पनेतून शिवाजीनगर येथील मैदानावर क्रिकेट अकॅडमी सुरू आहे. या ठिकाणी कोच मनोज लोखंडे आणि दीपक मुरकर खेळाडूंना प्रशिक्षण देतात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्याची खेळाडूंनी संधी मिळावी तसेच गावाचे नाव मोठे व्हावे हे उद्दिष्ट समोर ठेवून या क्रिकेट मैदानावर प्रशिक्षण दिले जाते तसेच देश, विदेश व राज्यातील अनेक व्यावसायिक अशा क्रिकेट संघांना या मैदानावर खेळण्यासाठी आमंत्रित केले जाते.



अशाच प्रकारे शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर दक्षिण आफ्रिका या देशातील क्रिकेट संघाविरुद्ध अहिल्यानगरमधील क्रिकेट संघाची मैत्रीपूर्ण लढत नुकतीच रंगली. यामध्ये शिवाजीनगर अकॅडमीच्या देवांश भोईर, पियुष पाटील आणि करण चौधरी या खेळाडूंना संधी देण्यात आली तसेच विद्याविहारमधील राजवाडा या क्रिकेट क्लबचे खेळाडूदेखील या ठिकाणी क्रिकेट खेळण्यासाठी आले होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी येथे भेट देऊन शिवाजीनगर अकॅडमीमध्ये क्रिकेट खेळण्यासाठी मोठी पसंती मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. कोच मनोज लोखंडे, दीपक मुरकर यांच्यासह खेळाडू उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या आशीर्वादाने त्यांच्या स्वप्नातील क्रिकेट ग्राउंडचे अस्तित्व इथे उभे राहिले असून गावातील मुलांना जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी तयार करण्याचा त्यांचा मानस आहे. यासाठी प्रशिक्षक कार्यरत आहेत.

## निवडक

### मृत जवानांच्या कुटुंबियांना राज्य सरकारकडून मदत

**मुंबई :** जम्मू काश्मीरमधील पूंछ येथे कर्तव्यावर असताना रस्ते अपघातात भारतीय सैन्याचे पाच जवान शहीद झाले. यात मराठा रेजिमेंटचे नायक शुभम घाडगे व अक्षय निकुरे या महाराष्ट्रातील जवानांचा समावेश आहे. राज्य सरकारने या दोघांच्या वारसांना एक कोटी रुपये आर्थिक मदत व इतर लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती भाजपचे नेते व मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर दिली.

### अजय माकन यांची हकालपट्टी करा; आपचा काँग्रेसला अल्टिमेटम

**नवी दिल्ली :** अरविंद केजरीवाल यांना पाठिंबा देणे व युती करणे ही चूक होती. त्यांची कोणतीही विचारधारा नाही. ते देशद्रोही आहेत, अशी टीका काँग्रेस नेते अजय माकन यांनी केले होते. यावर आता आम आदमी पक्षाने, माकन यांच्यावर २४ तासांत कारवाई करा; अन्यथा इंडिया आघाडीतील इतर घटक पक्षांशी चर्चा करून काँग्रेसच्या हकालपट्टीची मागणी केली जाईल, असा इशारा दिला आहे.

# विधानसभा निवडणुकीतील पराभवामुळे संजय राऊत यांच्या मनावर परिणाम

## खासदार सुनील तटकरे यांचा टोला




**अलिबाग : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीतील पराभवामुळे संजय राऊत यांच्या मनावर खूप परिणाम झाला आहे. त्यामुळे त्यांनी मानसोपचार तज्ज्ञांकडून उपचार करून घ्यायला हवेत, अशी खोचक टिप्पणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी गुरुवारी (दि. २६) अलिबाग येथे पत्रकार परिषदेत केली.

मंत्री धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात घेणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राजीनामा घ्या, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केली होती. या संदर्भात प्रतिक्रिया देताना खासदार तटकरे यांनी त्यांचा समाचार घेतला.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळाले. मंत्रिमंडळ विस्ताराला काही प्रमाणात उशीर झाला, पण त्यामुळे सरकारचे काम थांबले नव्हते. तीन पक्षांचे सरकार असते तेव्हा निर्णय प्रक्रियेला वेळ लागू शकतो. पालकमंत्रिपदावरून अनेक जिल्ह्यात घटक पक्षांचे कार्यकर्ते आग्रही असू शकतात. रायगड जिल्ह्यातील दोन आमदारांची मंत्रिपदावर वर्णी लागली आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांनी पालकमंत्रिपदाची अपेक्षा ठेवणे गैर नाही, मात्र याबाबत मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री चर्चेतून निर्णय घेतील आणि त्यांचा निर्णय सर्व पक्षांना मान्य असेल, असे खासदार तटकरे म्हणाले.

छगन भुजबळ हे पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांनी त्यांची भूमिका मांडली, पण ही आमची पक्षांतर्गत बाब आहे. ते सध्या परदेशात गेले आहेत. ते परदेशातून परत आल्यावर या संदर्भात चर्चेतून मार्ग काढला जाईल, असे खासदार तटकरे यांनी सांगितले.

या वेळी राष्ट्रवादीचे हर्षल पाटील, अमित नाईक, चारूहास मगर, जयेंद्र भगत, मनोज भगत उपस्थित होते.

## विशाल गवळीला सात दिवसांची पोलीस कोठडी

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याणमधील मुलीचे अपहरण, अत्याचार आणि हत्या प्रकरणातील आरोपी विशाल गवळी याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

विशाल गवळीला बुधवारी शेगावमधून अटक केल्यानंतर त्याला गुरुवारी (दि. २६) सकाळी कल्याणमध्ये आणण्यात आले. सुरुवातीला तो ठाणे क्राईम ब्रांचच्या ताब्यात होता. त्यानंतर त्याला कोळशेवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले असता २ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. विशालची पत्नी साक्षी गवळीलाही सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## राजगुरूनगरमध्ये दोन अल्पवयीन बहिणींवर बलात्कार करून खून

### आरोपीला अटक

**पुणे : प्रतिनिधी**

दोन अल्पवयीन बहिणींवर अत्याचार करून त्यांची हत्या केल्याची घटना पुणे जिल्ह्यातील राजगुरूनगर येथे घडली. या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी ५४ वर्षीय आरोपी अजय दास याला व्यक्तीला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी हा एका स्थानिक हॉटेलमध्ये स्वयंपाकी म्हणून काम करतो आणि पीडित मुलींच्या शेजारीच राहतो तसेच तो मुलींच्या कुटुंबियांनादेखील ओळखत असल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. या ८ व ९ वर्षांच्या दोन मुलींचे मृतदेह बुधवारी (दि. २५) रात्री त्यांच्या घराजवळील एका खोलीत पाणी साठवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ड्रममध्ये आढळून आले होते.




आरोपीने आधी वयाने लहान मुलीवर लैंगिक अत्याचार केला आणि नंतर तिचा आरडाओरडा ऐकून मदतीसाठी धावून आलेली मोठी बहीणदेखील त्याच्या तावडीत सापडली. आरोपीने दोन्ही पीडित मुलींची हत्या केली आणि त्यांचे मृतदेह पाण्याच्या ड्रममध्ये फेकले.

मुलींचा खून करून परराज्यात पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी आरोपीला अटक केली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीगचा ऑक्शन उत्साहात

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ट्रॉफीचे अनावरण




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीगच्या यंदाच्या चौथ्या पर्वातील लिलाव (ऑक्शन) सोहळा आमदार प्रशांत ठाकूर, रोटरी प्रांत ३१३१चे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे, रोटरी क्लब ऑफ पनवेल मिडटाऊनचे माजी अध्यक्ष विजय निगडे, पनवेल सिटीचे अध्यक्ष डॉ. रोहित जाधव यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते स्पर्धेच्या ट्रॉफीचे अनावरण करण्यात आले.

रोटरी प्रीमियर लीग ही रोटरी प्रांत ३१३१मधील क्रिकेटप्रेमी रोटरी सदस्यांसाठी पनवेल परिसरात आयोजित करण्यात येणारी स्पर्धा असून या वर्षी स्पर्धेचे चौथे वर्ष आहे. ही स्पर्धा १०, ११, १२ व १७, १८, १९ जानेवारी २०२५ या दिवशी खेळवली जाणार आहे. रायगड रोटरी वॉरियर्स स्पर्धेचे आयोजक असून स्पर्धेत रोटरी ३१३१ प्रांतातील ४० वर्षावरील ७८ रोटरी सदस्य खेळाडू म्हणून सहभागी झाले आहेत. हे सदस्य सहा विविध संघात प्रत्येकी १३ खेळाडू या प्रमाणे आयपीएल धर्तीवर लिलाव (पैशांच्या ऐवजी पॉईंट्स) पद्धतीने निवडले जातात. स्पर्धेचे टीआयपीएल मुख्य प्रयोजक असून रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल व पनवेल सिटी हे सहप्रयोजक आहेत.

पनवेलजवळील पळस्पे फाटा येथील जय मल्हार हॉटेलच्या किनारा लॉनवर झालेल्या लिलाव सोहळ्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी अशा प्रकारे क्रीडा स्पर्धा आयोजित केल्याबद्दल रोटरी क्लब व सर्व खेळाडूंचे कौतुक केले. आपापले व्यवसाय, समाजसेवा करून फिटनेसची काळजी घेत खेळाचे मैदान गाजवा, असे आवाहनही त्यांनी केले.

रोटरी क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे यांनी सर्व खेळाडूंनी दरवर्षीप्रमाणे यंदाही दिमाखदार खेळ करावा, असे सांगून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. **(पान २ वर..)**

# थर्टीफर्स्ट, नववर्ष स्वागताची तयारी

**ठाणे : प्रतिनिधी**

डिसेंबर महिन्याच्या अखेरीस नववर्षाचे स्वागत करण्याचा उत्साह प्रत्येक ठिकाणी शिगेला पोहचतो. तसाच उत्साह यंदादेखील दिसून येत आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी हॉटेल्स आतापासूनच सज्ज होऊ लागली असून ऐनवेळी गैरसोय टाळण्यासाठी अनेक हॉटेलवाल्यांनी आतापासूनच टेबल बुकिंग सुरू केले आहे.

सर्वच बार, हॉटेल व ढाब्यांवर थर्टीफर्स्टची जोरदार पूर्वतयारी करण्यात आली आहे. त्याचबरोबर रिसॉर्टस्, फार्महाऊसलाही पसंती मिळत असल्याने त्यांनीही नियोजन केले आहे.

नववर्षाचे स्वागत करण्यासाठी चिकन, मटण विक्रेत्यांनीही मोठी तयारी



केली असून चिकन, मटण आणि माशांची ऑर्डर आधीच बुक होऊ लागली आहे. विक्रेत्यांनी मागील आठवड्यापासूनच बोकड, कोंबड्या खरेदी करून ठेवले आहेत. चिकन, मटणाच्या बरोबरीला नववर्षाला माशांनाही बऱ्याच प्रमाणात मागणी असते तसेच न्यू इयर सेलिब्रेशनमध्ये बिर्याणीची मोठी भूमिका असते. अनेकजण बिर्याणी पार्टीचा बेत आखतात. त्यामुळे या ऑर्डरही सुरू झाल्या आहेत.

मद्य, क्लबमधील पार्ट्या अन् काही वस्तूंवरील व्हॅट वाढला आहे. त्यामुळे यंदाच्या ३१ डिसेंबरची पार्टी महागणार आहे. असे असले तरी मद्यप्रेमींकडून नववर्ष साजरा करण्याची जोरदार तयारी सुरू झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

सर्वांना नववर्षाचे वेध लागले असताना पोलिसांनीही आपल्या परीने तयारी सुरू केली आहे. थर्टीफर्स्टच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेसाठी पोलीस सज्ज होत असून ३१ डिसेंबरला रात्रीपासून नववर्षाच्या पहाटेपर्यंत महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त असेल. या वेळी मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे.

दरम्यान, समुद्र किनारी, आलिशान उपाहारगृहात, प्रेक्षणीय स्थळी नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी हजारोंच्या संख्येने पर्यटक मुंबईत दाखल होतात. मुंबई महानगरातील पर्यटनस्थळी नागरिकांची गर्दी असते. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत मुंबई गाठण्यासाठी आणि मुंबईतून उपनगरांत परतीचा प्रवास करणाऱ्यांसाठी विशेष लोकल धावणार आहेत. त्यामुळे लोकांना सोयीचे होईल.

# केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवा -खासदार सुनील तटकरे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध महत्वाकांक्षी योजना असून या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश खासदार सुनील तटकरे यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित विविध शासकीय विभागांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.



या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उप मुख्य कार्यकारी जि.प.सत्यजित बडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग जगदीश सुखदेवे, जिल्हा नियोजन अधिकारी ज.द.मेहत्रे यांसह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे म्हणाले की, जिल्ह्यात असलेल्या दिव्यांग, अपंग व्यक्तींना त्यांची तपासणी करुन आवश्यक असलेले साहित्य, उपकरणे यांचा पुरवठा करण्यात यावा. तसेच वयोश्री योजनेंतर्गत जिल्ह्यातील ६५ वयोमर्यादेवरील ज्येष्ठ नागकांसाठी जिल्ह्यात तालुकानिहाय शिबिरांचे आयोजन करुन त्यांची योग्य ती तपासणी करावी. शहरी भागातील नागरिकांसाठी ग्रामीण रुग्णालय तर ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शिबिरांचे आयोजन करावे. वयोश्री योजनेंतर्गत शिबिरांचे कामकाज दि.१५ ते दि.२० जानेवारी २०२५ पर्यंत पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी संबंधित विभागाला यावेळी दिल्या.

केंद्र शासनाच्या असलेल्या वयोश्री योजनेमधून तपासणी केलेल्या पात्र लाभार्थ्यांना आवश्यक साहित्य, उपकरणे देण्यात यावी. तर राज्य शासनाच्या योजनेमधून तपासणी केलेल्या पात्र लाभार्थ्यांना रु.३ हजार देण्यात यावे. तालुका निहाय शिबिरांचे आयोजन करताना तेथील लोकप्रतिनिधींनाही कळविण्यात यावे. केंद्र व राज्य शासनाच्या वयोश्री योजनेकरिता आवश्यक असलेल्या निधीची उपलब्धतता करुन दिली जाईल. शिबिरांमध्ये तपासणी केलेल्या नागरिकांची योग्य रितीने तपासणी करुन त्या प्रत्येकांची नोंद जतन करुन ठेवावी.

जिल्ह्यातील बँकांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांकरिता दिलेले उद्दिष्ट विहित वेळेत पूर्ण करावे. शेतकऱ्यांना खरीब व रब्बी पिकांसाठी आवश्यक असलेल्या कर्ज प्रकरणांची कार्यवाही तातडीने करून शेतकऱ्यांना कर्ज विहित वेळेत कसे मिळेल ते पाहावे. ज्या बँकांचे पिक कर्ज वाटपाचेप्रमाण कमी आहे. त्या बँकांच्यावर कायदेशीर कारवाही करण्याचा इशारा खासदार सुनील तटकरे यांनी दिला. बँकांनी संवेदनशील होऊन त्यांच्याकडे असलेली विविध केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची कर्ज प्रकरणे तातडीने मंजूर करावी, कर्ज प्रकरणे मंजूर करण्यास बँकांनी चालढकल केल्यास संबंधित बँक अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच बँकांनी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाची माहिती नावांसह सादर करावी, अशा सूचना संबंधित बँक अधिकाऱ्यांना दिल्या.

विविध विभागांच्या कामांचा आढावा घेताना केंद्रांची पंतप्रधान ग्रामसडक योजना व राज्याच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची कामे विहित वेळेत पूर्ण करावीत. सन-२०२४-२५ या आर्थिक वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर असलेली कामे ३१ मार्च पर्यंत पूर्ण करावीत. ही कामे पूर्ण करीत असताना केलेल्या कामांचा दर्जा, गुणवत्ता चांगली असली पाहिजे. रोहा-अलिबाग रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशा सूचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्ह्यात येणाऱ्या उद्योगांमुळे स्थानिकांना रोजगार निर्मिती होणार आहे. रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या निधी उपलब्ध करुन दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## माथेरानचा आकाशगंगा प्रकल्प सुरू करावा

### भाजपच्या सुभाष भोसलेंची मागणी

**माथेरान : बातमीदार**

आकाशगंगा प्रकल्पामुळे पर्यटकांचा अवकाशातील अभ्यास आणि पर्यटनही होत होते.काही वर्षांपासून आकाशगंगा हा महत्वकांक्षी प्रकल्प बंद अवस्थेत असून येथे येणाऱ्या पर्यटकांना या पासून वंचित राहावे लागत आहे.सदर प्रकल्प लवकर सुरू करावा यासाठी माथेरान भाजपा शहर उपाध्यक्ष शुभाष भोसले यांनी पालिकेला निवेदन देऊन मागणी केली आहे.

रायगड जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये आकाशगंगा प्रकल्प सुमारे दीड कोटी रुपये खर्च करून सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ दा.कृ. सोमण यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आला आहे .

या प्रकल्पात आकाशगंगेतील तारे, ग्रह, धूमकेतू यांच्या संबंधी माहिती देणारे कागदी फलक, अद्ययावत थ्री डी थिएटर लाखो रुपये किंमतीच्या दुर्बिणीतून अवकाशातील ग्रह , तारे दाखविले जात होते. प्रकल्प पाहण्यासाठी खगोल अभ्यासक येऊ लागले होते.या प्रकल्पामधून अवकाशातील उल्कापात,ग्रहणे,चंद्राचा लहान,मोठा होणार आकार,पृथ्वीच्या जवळ आलेला शनी ग्रह हे पाहिले आहेत. अवकाशातील आंतरराष्ट्रीय लॅबचे दर्शन सुद्धा काही सेकंदासाठी पाहिले आहे.असा हा महत्वकांक्षी प्रकल्प बंद अवस्थेत असल्यामुळे खगोल प्रेमीमध्ये नाराजी दिसून येत आहे.



## इमेज कॅलेंडरमध्ये अवतरले रायगड जिल्ह्यातील निसर्गसौंदर्य

### * १२ छायाचित्रकारांच्या छायाचित्रांची निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

इमेज कॅलेंडर आयोजित छायाचित्र स्पर्धेचे यंदाचे सातवे वर्ष आहे. जिल्ह्यातील हौशी आणि व्यावसायिक छायाचित्रकारांच्या कलेला वाव देण्यासाठीची परंपरा इमेज कॅलेंडरने कायम ठेवली आहे. यंदाही २०२५च्या वार्षिक कॅलेंडरसाठी रायगड जिल्ह्यातील निसर्गाने नटलेली पुरातन मंदिर छायाचित्र यांनाही स्पर्धेत संधी देण्यात आली होती.



जिल्ह्यातून सादर झालेल्या शेकडो छायाचित्रांमधून १२ छायाचित्रांची निवड मान्यवर परीक्षकांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. स्पर्धेला जिल्ह्यातून शेकडो छायाचित्रकारांचा सहभाग लाभला होता. यामुळे २०२५ च्या इमेज कॅलेंडरच्या दिनदर्शिकेमध्ये जिल्ह्यातील निसर्गाने नटलेली पुरातन मंदिर यांची छबी अवतरलेली पहावयास मिळणार आहे.

या स्पर्धेत वैभव शिंदे - अलिबाग, पंकज गोंधळी - खंडाळे अलिबाग, कल्पेश पाटील - महाड, सचिन असरानी - अलिबाग, नितिन शिर्के - पाली, प्रफुल्ल पवार -नांदवी- माणगांव, परिणीती कांबळे - वरसोली, प्रितम सकपाळ - महाड, समाधान पाटील - पेण, अविनाश राऊत - खोपोली, निलेश पाटील - ढवर, भारत रांजणकर - एकदरा - मुरूड यांच्या छायाचित्राची निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी सादर करण्यात आलेल्या छायाचित्रांमधून कॅलेंडरसाठी बारा चित्रांची निवड करणेसाठी संस्थेने अलिबाग येथील विजय मयेकर यांची निवड केली होती. त्यांच्या परीक्षणानंतर बारा छायाचित्रणाची निवड करण्यात आली आहे.

## 'आंबेडकरी आई'चे उद्या प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेत दलित समाजातील अनेक महिलांनी आपल्या मुलींना उच्चशिक्षित केलेले आहे. अशा आदर्श ४२ मातांची समाजाला ओळख करून देणारा एक आगळा ग्रंथ 'आंबेडकरी आई' शनिवारी (दि.२८) मुंबईत प्रकाशित होणार आहे.

संध्याकाळी ४ वाजता दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात हा प्रकाशन समारंभ आंबेडकरी स्त्री संघटनेने आयोजित केला आहे. अर्थतज्ज्ञ, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील या समारंभात डॉ. सिसिलिया कार्व्हालो, प्रा. डॉ. अजित मकदुम, डॉ. प्रज्ञा दया पवार हे प्रमुख वक्ते आहेत. या ग्रंथाचे संपादन प्रा. आशालता कांबळे आणि डॉ. श्यामल गरुड यांनी केले आहे.

## वनमंत्री गणेश नाईक यांनी पदभार स्वीकारला

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याच्या वन खात्याचा पदभार गुरुवारी गणेश नाईक यांनी मंत्रालयात स्वीकारला. वन खात्यासंबंधी जनसामान्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. माजी खा.डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक आणि वरिष्ठ वन अधिकारी यावेळी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्याप्रमाणे शंभर दिवसांचा विकासाचा कृती आराखडा तयार केला आहे त्याच पार्श्वभूमीवर शंभर दिवसांचा वनखात्याचा कृती कार्यक्रम तयार केल्याची माहिती ही त्यांनी दिली. वन खात्याचा पदभार स्वीकारण्यापूर्वी नामदार गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन वनखात्यासंबंधी महत्त्वाचया विषयांवर चर्चा केली.

राज्यामध्ये कागदाचे उत्पादन वाढविण्यासाठी बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यात येईल. केंद्र सरकारने देशात बांबूची लागवड वाढवण्यासाठी तज्ञ अभ्यास समिती नियुक्त केली आहे. या समितीचे मार्गदर्शन या अनुषंगाने घेण्यात येईल, असेही वनमंत्री नामदार गणेश नाईक म्हणाले. गाव आणि वन खात्याच्या संयुक्त प्रयत्नातून वनक्षेत्राचे व्यवस्थापन करण्यावर भर देण्यात येईल. प्राण्यांचा अधिवास सुरक्षित ठेवून मानवावरील वाघांचे वाढते हल्ले थांबविण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले.

बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनी वनमंत्री नामदार गणेश नाईक यांना दूरध्वनी करून त्यांच्या मतदारसंघात बिबट्या तसेच बंगाल टायगर्स यांचा वावर वाढला असल्याची माहिती दिली असता तात्काळ चौकशी करून उपाययोजना करण्याच्या सूचना वन मंत्री गणेश नाईक यांनी वन अधिकाऱ्यांना दिल्या.

## महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांचे साई नाक्यावर जंगी स्वागत

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील आमदार अदिती तटकरे यांचे मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाली. दुसऱ्यांदा महिला व बाल विकास खाते मिळाल्यानंतर साई विभागातील कार्यकर्त्यांकडून साई नाक्यावर अदिती तटकरे यांचे ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले.

साई विभागातील महिलांनी अदितीताईंचे औक्षण करून स्वागत केले. बहीण माझी लाडकी या योजनेसाठी ताईंच्या कुशल नेतृत्वामुळे लाडक्या बहिणीला या योजनेचा लाभ घेता आला याची प्रचीती महिलांच्या उपस्थितीतून दिसून आली. माणगांव तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष सुभाष केकाणे, शादाब गैबी, शैलेश भोनकर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी साई ग्रामपंचायतीच्या सरपंच हवाबी राहटविलकर, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच हुसेन राहटविलकर, मुश्ताक जळगावकर, जमातीचे अध्यक्ष इब्राहिम जुवले, लियाकत राऊत, प्रकाश धुमाळ, प्रवीण अधिकारी, काशीराम मोरे, ऊसर बुद्रुक गावचे मुंबई मंडळ कार्यकारणी सदस्य, पदाधिकारी तसेच साई कोंड, खैरेवाडी, विहूले गावचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी त्यांचे श्रीफळ व शाल देऊन स्वागत केले.



पान १ वरुन

## टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीगचा ऑक्शन उत्साहात

ऑक्शन सोहळा यशस्वी करण्यासाठी रोटरी रायगड वॉरियर्स संघांचे अध्यक्ष गणेश कडू, सचिव डॉ. संतोष जाधव, खजिनदार अतिश थोरात यांच्यासह सतिश देवकर, पंकज पाटील, देवेंद्र चौधरी, प्रितम कैय्या, सुदीप गायकवाड, ऋषी बुवा, अमित पुजारी, डॉ. आमोद दिवेकर, विकेश कांडपिळे, संतोष घोडिंदे, विनोद भोईर, आनंद माळी, पुष्कराज जोशी आदी सदस्यांनी मेहनत घेतली.

**विविध संघ व त्यांचे कर्णधार**

बीकेसी संघ : मालक भाऊ कोकणे व कर्णधार अविनाश बारणे, प्राईम दादा संघ : मालक दादा दिवटे व कर्णधार विजय कोतवाल, रिवेल विनर संघ : मालक महेश घोरपडे व कर्णधार अरविंद चौहान, बाश्री संघ : मालक प्रशांत (मामा) तुपे व कर्णधार सिकंदर पाटील, पिंपरी एलिट इगल संघ : मालक चंदू पाटील व कर्णधार योगेश वाघ, आर.आर. फायटर्स संघ : मालक राहुल टिळेकर व कर्णधार राहुल कामठे.

## ना. भरत गोगावले यांनी सहकुटूंब घेतले आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे आशीर्वाद

**रेवदंडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचीत रोजगार हमी,फलोत्पादन खारपाणपट्टा विकास कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांनी रेवदंडा येथे निवासस्थानी जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉं. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची सदिच्छा भेट घेउन शुभाआशिर्वाद घेतले.

रेवदंडा येथिल डॉं. आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे निवासस्थानी सकाळी अकरा वाजता महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचीत रोजगार हमी,फलोत्पादन खारपाणपट्टा विकास कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांचे आगमन झाले. यावेळी त्याचे समवेत त्यांची पत्नी माजी जि.प.सदस्या सुषमा गोगावले, मुलगा युवासेना महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य व कोकण विभाग सचिव विकासशेठ गोगावले, मुलगी कोमल गोगावले-मोरे, बंधू महाड तालुका संपर्क प्रमुख प्रमोद गोगावले, महाड उपतालुका प्रमुख राजू मांडे होते



यावेळी आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी भरतशेठ गोगावले यांचे स्वागत व सत्कार शाल,श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून केला. यावेळी जेष्ठ निरूपणकार सचिनदादा व राहूलदादा धर्माधिकारी उपस्थित होते.भरतशेठ गोगावले यांनी परिवारासह जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉं. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना शाल,श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून शुभाआशिर्वाद घेतले.

## राधाकृष्णन बी. यांनी स्वीकारला पदभार

**मुंबई : प्रतिनिधी**

राधाकृष्णन बी. हे भारतीय प्रशासनिक सेवेतील २००८ तुकडीतील महाराष्ट्र संवर्ग अधिकारी असून नुकतेच त्यांनी ऊर्जा क्षेत्रातील अग्रगण्य अशा महानिर्मितीच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदाचा पदभार गुरुवारी (दि.२६) डॉ. पी. अन् बलगन (भा.प्र.से.) यांचेकडून स्वीकारला आहे.

मॅरेथॉन, सायकलिंग, गिर्यारोहण, क्रिकेट, फुटबॉल या क्रीडा प्रकारात त्यांना विशेष आवड आहे. विजेच्या मागणीनुसार महानिर्मितीचे किफायतशीर दरात वीज उत्पादन अखंडित ठेवणे तसेच औष्णिक कडून हरित ऊर्जेकडे वाटचालीला गती देणे आणि प्रस्तावित महत्वाकांक्षी वीज प्रकल्पांना गती देणे हे प्राधान्यक्रम असल्याचे त्यांनी सांगितले.


## संपादकीय

# कठोरात कठोर शिक्षाच हवी

कल्याण व राजगुरुनगर या दोन्ही ठिकाणच्या लैंगिक अत्याचार व हत्येच्या घटना अतिशय दुर्दैवी असून माणुसकीला काळिमा फासणाऱ्या आहेत. विकृत नराधमांच्या वासनेला बळी पडलेल्या या तीन मुलींची वये अवघी तेरा व आठ-नऊ अशी आहेत. साहजिकच या घटनांमुळे त्या-त्या परिसरातील लोक हादरले असून आरोपींना फासावर लटकवण्याची मागणी होते आहे. दोन्ही घटनांमध्ये पोलिसांनी वेगाने कारवाई करीत आरोपींना अटक केली असून त्यांना कठोरात कठोर शिक्षाच व्हायला हवी.

**कल्याणमधील एका अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार व खुनाची घटना ताजी असतानाच पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगरमध्ये दोन लहान मुलींचे मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत सापडल्याची धक्कादायक बातमी गुरुवारी समोर आली. कल्याणमधील घटनेत संध्याकाळी खाण्यासाठी काही तरी घेण्यासाठी घराबाहेर पडलेल्या मुलीला कुख्यात गुंड विशाल गवळीने अपहरण करून घरी आणले व बलात्कार करून तिची हत्या केली. नंतर मृतदेह एका बॅगमध्ये ठेवून काही अंतरावरच्या निर्जन परिसरात तो टाकून दिला असे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. या घटनेत आरोपीला मदत करणारी त्याची पत्नी तसेच रिक्षाचालकालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीला बुलढाण्यातून तर त्याच्या पत्नीला घरातून अटक करण्यात आली. आरोपीची पत्नी ही त्याची तिसरी पत्नी असून त्याच्यावर विनयभंग आणि लैंगिक अत्याचाराचे सहा गुन्हे दाखल आहेत. पत्नी साक्षी हिने आधी गुन्ह्यातील त्याचा सहभाग नाकारला. परंतु पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर तिने अवघा घटनाक्रम सांगितला. भीतीपोटी घरातील रक्ताचे डाग पुसण्यात त्याला मदत केल्याचे बँकेत नोकरी करणाऱ्या साक्षीने सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून आरोपींना कठोर शिक्षा होण्याबाबत आधीच निर्देश दिले आहेत. या दोघांनाही २ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुंडाची कल्याण पूर्वेतील परिसरात दहशत होती हेही समोर आले आहे. एकीकडे तो कुणाच्या पाठबळाने आजवर मोकाट होता याच्या चौकशीची मागणी होते आहे तर दुसरीकडे तो मनोरुग्ण असल्याचीही चर्चा आहे. त्याच्यासारख्या विकृत नराधमांवर वेळीच कठोर कारवाई झाली तर अजाण मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचू शकेल. कल्याणच्या या दुर्दैवी घटनेपाठोपाठ बुधवारी रात्री समोर आलेली घटना तर अवघ्या राजगुरुनगरला हादरवून गेली. घरावरील खोलीत राहणाऱ्या परप्रांतीय भाडेकरूनेच दोन लहानग्या मुलींवर अत्याचाराचा प्रयत्न केला आणि त्यांनी आरडाओरडा करताच घाबरून त्यांची हत्या केली असे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. हा आरोपी परराज्यात पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी त्याला अटक केली. दोन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांनी शिताफीने कारवाई केली आहे ही समाधानाची बाब आहे. दोन्ही प्रकरणांची फास्ट ट्रॅक सुनावणी करण्याचे आदेशही देण्यात आले असून विकृतांना कठोर शिक्षा व्हायलाच हवी आहे. विरोधकांनी मात्र अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये राजकारण आणण्याचे टाळायला हवे आहे. यापूर्वीच्या अशा गुन्हेगारी प्रकरणांत विरोधकांनी जनतेच्या आंदोलनांमध्ये भाडोत्री कार्यकर्त्यांकरवी राजकीय फलक नाचवल्याचे दिसले आहे. अजाण मुलींवरील अशा स्वरुपाचे अत्याचार हे दुर्दैवीच असून या प्रकरणांमध्ये विकृत आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी असे ठाम प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. अशातऱ्हेच्या लैंगिक विकृतीला अटकाव करण्यासाठी आणखी काय करता येईल याचाही गंभीर विचार व्हायला हवा.**

# पर्यटकांना आवश्यक सुविधा मिळणे गरजेचे



सध्या नाताळची सुट्टी आहे. या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी लोक पर्यटनासाठी मोठ्याप्रमाणावर बाहेर पडले आहेत. पर्यटनासाठी लोक कोकणात येत आहेत. त्यातही कोकणातील रायगड जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त आहे. या जिल्ह्यात पर्यटक येत असले तरी येणाऱ्या पर्यटकांसाठी सुविधा नाहीत.

रायगड जिल्ह्यात समुद्रकिनारे आहेतच शिवाय गडकिल्ले, ऐतिहासिक स्थळे, तिर्थस्थाने आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात पर्यटकांची संख्या वाढत आहे. अलिबाग तालुक्यात अलिबाग, मांडवा, सासवणे, आवास, किहीम, वरसोली, आक्षी, नागाव, चौल आणि रेवदंडा ही समुद्र किनार्यावरील गावे पर्यटनस्थळे म्हणून नावारूपास आली आहेत. मुरुडमधील काशिद, नांदगाव आणि मुरुड, श्रीवर्धनमधील दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर, भरडखोल, वेळास पर्यटकांच्या पसंतीला उतरत आहेत. या शिवाय रायगड किल्ला, माथेरान, एलिफंटा लेणी यांचे अप्रूप जगभरातील पर्यटकांना आहे. पूर्वी उन्हाळा आणि हिवाळा या दोन ऋतूंत पर्यटकांचा ओढा रायगड जिल्हयात असायचा पण आता वर्षा ऋतूतही रायगडमध्ये येणार्या पर्यटकांची संख्या लक्षणीय वाढली आहे. कर्जत, माणगाव, महाड, पोलादपूर आणि रोहा तालुके वर्षा सहलीसाठी प्रसिद्ध झाले आहेत. कर्जतमधील पेब किल्ला, इरशाळगड, माणिक गड, कोथळी गड, सोलनपाडा धरण, सागरगड, ताम्हाणी घाट, देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉइंट, कुंभे धबधबा आणि परिसर, कोथेरी धबधबा, रायगड किल्ला, मोरझात धबधबा आणि कुडपण ही प्रमुख वर्षा पर्यटनस्थळे बनली आहेत. पर्यटनसाठी आवश्यक असलेले सर्व घट रायगड जिल्ह्यात आहेत. हे सर ठिक असल तरी पर्यटकांना आवश्यक त्या सुविधा मिळतात का ? हा प्रश्न आहे.

पर्यटन स्थळांचा पायाभूत सुविधांच्या दृष्टीने अपेक्षीत विकास होऊ शकला नाही. रस्ते, पाणी, वाहनतळ, प्रसाधानगृह, बगीचे यासारख्या सोयी सुविधांची कमतरता याठिकाणी प्रकर्षाने जाणवते . स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मर्यादीत उत्पन्न आणि जिल्हा विकास योजनेतून मिळणारा अपुरा निधी यामुळे पर्यटनाच्या अनुशंगाने अपेक्षीत सोयी सुविधा मिळत नाहीत. राज्यसरकारने अलिबगा, मुरूड व श्रीवर्धन तीन केंद्रांना पर्यटनाचा ब वर्ग दिला आहे. या निर्णयामुळे तीनही ठिकाणच्या पायाभुत सुविधांच्या विकासाला काहीशी गती मिळाली. रायगड किल्ला प्रधिकारणामुळे तेथे काही काम सूरू आहेत. परंतु इतर पर्यटनस्थळांच काय ? तेथे पर्यटाकांसाठी आवश्यक त्या सुविधा नाहीत. आलेला पर्यटक थांबला पहिजे. तरच पर्यटन व्यवसाय खर्याज अर्थाने वाढेल. जर निवास व भोजनाची चांगली सुविधाच नसेल तर पर्यटक थंबणार नाही. त्यामुळे स्थानिक पर्यटन व्यावसायिंकांना प्रोत्साहन द्यालया हवे. त्यांना देखील काही सवलती दिल्या पाहिजे. पर्यटन व्यासाया वाढला पाहिजे म्हणायचे आणि हा व्यवसाय करणार्यांवर कारवाया करायच्या हा कुठला न्याय आहे. जे लाक पर्यटन व्यवसाय करतात त्यांना काही सवलती मिळाल्या पाहिजे. केवळ भिंती बांधल्या आणि दिशादर्शक फलक लावले म्हणजे पर्यट वाढेल अस नाही.

आजही रायगड जिल्ह्यातील काही पर्यटनस्थळे अशी आहेत तेथे सुविधा नाहित. रस्ते नाहीत. निवास व्यवस्था नाहित. या सुविधा नसल्यामुळे पर्यटक तेथे थांबत नाहीत. पोलादपूर तालुक्यातील कुडपन हे एक थंड हवेचे ठिकाण आहे. ते अजून कुणाला महित नाही. त्याची प्रसिध्दी व्हायला हवी, तेथे चांगल्या सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. जर या ठिकाणी पर्यटकांसाठी सुविधान निर्माण केल्या तर पर्यटक तेथे जास्त जातील. तेथील पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल. रोजगार निर्मिती होईल. काही समुद्रकिनारे असे आहेत जेथे जलक्रीडेच्या सुविधा नाहित. तेथे या सुविधा उपलबध्द काशा होतील या बाबत प्रयत्न व्हायला हवेत. अनेक समुद्रकिनार्यावर पर्यटकांसाठी चेंजिंग रूमम नाहित. स्वच्छागृह नाहित ती उपलबध्द व्हायला हवीत. केवळ पर्यटनस्थळे आहेत म्हणून पर्यटन व्यवसाय वाढतो असे नाही. पर्यटकांसाठी चांगल्या सुविधा असतील तर पर्यटक येतील थांबतील त्यातून राजगार निर्मिती होईल.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

# रसायन-जीवशास्त्रज्ञ लुई पाश्चर

२७ डिसेंबर १८२२ रोजी जन्मलेले फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ आणि जीवशास्त्रज्ञ लुई पाश्चर यांनी निसर्गातील सूक्ष्मजीवसृष्टीकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन दिला. पाश्चर यांना लहानपणी शिक्षणापेक्षा मासेमारी व चित्रकला यात विशेष रस होता. इ.स.१८४७मध्ये डॉक्टरेट संपादन केल्यावर स्टॉसबर्ग विद्यापीठात त्यांची प्राध्यापकपदावर नियुक्ती झाली. त्यांचे सुरवातीचे संशोधन रसायनशास्त्रात होते.

टार्टारिक आम्लाच्या रेणूंचा अभ्यास करताना त्यांच्या लक्षात आले की नैसर्गिक आणि कृत्रिमरीत्या तयार केलेल्या टार्टारिक आम्लाचे भौतिक आणि रासायनिक गुणधर्म एकसारखे असले तरी त्याची ध्रुवीकृत प्रकाशाची दिशा बदलण्याची क्षमता वेगळी असते. या आम्लाच्या स्फटिकांचा सखोल अभ्यास करून पाश्चर यांनी आण्विक विषमतेचे अस्तित्व शोधले. यालाच आज स्टीरिओकेमिस्ट्रीचा पाया मानला जातो.



१८५४मध्ये लिले विद्यापीठात विज्ञान शाखेचे डीन असताना, त्यांना स्थानिक डिस्टिलरीमध्ये अल्कोहोल उत्पादनाशी संबंधित समस्या सोडवण्यास मदत करण्यास सांगितले. त्यांनी अल्कोहोलिक किण्वन प्रक्रियांमध्ये जीवांचा सहभाग असल्याचे प्रायोगिक पुरावे सादर केले. विविध किण्वन प्रक्रियेत त्यांचे विशिष्ट जीव संबंधित असल्याचे दर्शविले. यातूनच जैवतंत्रज्ञानाचा उगम झाला.

इ.स.१८६३मध्ये फ्रान्सचे सम्राट नेपोलियन-तिसरे यांच्या विनंतीनुसार, पाश्चर यांनी वाइन दूषित का होते, याचा अभ्यास केला. इतर अनावश्यक सूक्ष्मजीवांमुळे दूषित होण्यापासून रोखण्यासाठी, पाश्चर यांनी वाइन ६० अंश ते १०० अंश सेल्सिअस तापमानाला ३० मिनिटे गरम करण्याची प्रक्रिया वापरली. यालाच पाश्चरायझेशन असे संबोधतात. आज जगभरात अनेक पदार्थ, पेये व दुधाचे दीर्घकाळ जतन करण्यासाठी पाश्चरायझेशनचा वापर केला जातो.

फ्रान्समध्ये रेशमाच्या किडय़ावर रोगाची लागण होऊन रेशीमउद्योगाचे नुकसान होऊ लागले होते. त्यावर पाश्चर यांनी अळय़ांची दूषित झालेली अंडी नष्ट करून निरोगी अंडय़ांपासून अळय़ा तयार करण्यात यश मिळवले व रोगावर नियंत्रण झाले. **-डॉ. अपर्णा दुभाषी**




# व्हॉटसॲप १ जानेवारीपासून 'या' फोनमध्ये चालणार नाही

व्हॉटसअपने एक असा निर्णय घेतला आहे, ज्याचा फटका अँड्रॉईड फोन चालवणाऱ्या युजर्सना बसणार आहे. हो. आम्ही हे सत्य बोलत आहोत. मेटा कंपनीने १ जानेवारी २०२५ पासून काही अँड्रॉईड फोनचा सपोर्ट बंद करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. जर तुम्हीही अँड्रॉईड स्मार्टफोन चालवत असाल तर आजची बातमी खास तुमच्यासाठी आहे. व्हाटसअपच्या या नव्या बदलाविषयी जाणून घेऊया...



चला तर मग जाणून घेऊया व्हाटसअप कोणत्या स्मार्टफोनसाठी सपोर्ट संपवण्याचा प्लॅन आखत आहे. जर असे झाले तर ज्या स्मार्टफोनसाठी व्हाटसअप सपोर्ट संपेल त्या स्मार्टफोनमध्ये तुम्ही व्हाटसअप ॲप चालवू शकणार नाही. हे देखील या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे.

१ जानेवारी २०२५पासून अँड्रॉईड KitKat आणि जुन्या व्हर्जनवर काम करणाऱ्या स्मार्टफोनमध्ये व्हाटसअप हे ॲप काम करणार नाही. म्हणजेच जर तुमचा फोनदेखील या व्हर्जनवर चालत असेल तर आता तुम्हाला १ जानेवारीपासून व्हाटस अप चालवण्यासाठी नवीन फोनमध्ये अपग्रेड करावे लागेल, जे वरील व्हर्जनवर काम करते.

खालील स्मार्टफोन्सचे हार्डवेअर व्हाटसअपमध्ये येणाऱ्या फिचरशी सुसंगत नसल्यामुळे व्हाटसअप या स्मार्टफोन्सचा सपोर्ट बंद करत आहे.

व्हाटसअपच्या या निर्णयानंतर आता १ जानेवारीपासून Motorola Moto G, Samsung Galaxy S3, Samsung Galaxy Note २, Sony Xperia Z, LG Optimus G, Sony Xperia Z आणि HTC One X सह इतर स्मार्टफोनमध्ये काम करणार नाही.

रिपोर्टनुसार केवळ अँड्रॉईडच नाही तर व्हाटसअप आयओएस १५.१ आणि जुन्या व्हर्जनवर काम करणाऱ्या आयफोनचा सपोर्टदेखील काढून टाकू शकते. म्हणजेच व्हाटसअपच्या या निर्णयामुळे ५जी आय फोन ६ प्लस आणि आय फोन ६ चालवणारे युजर्स ॲप चालवू शकणार नाहीत. रिपोर्टनुसार आय फोन युजर्सना आपला फोन अपग्रेड करण्यासाठी ५ मे २०२५पर्यंत मुदत आहे.

# पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख

देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख ('भाऊसाहेब') यांची आज १२४वी जयंती... आपल्या देशाच्या कृषी क्षेत्रातील भरारीचा भक्कम पाया भाऊसाहेबांच्या कृषी धोरण आणि विचारांमुळे घातला गेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेती आणि कृषी क्षेत्राला नवा आकार देणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान राहिले आहे. त्यातूनच राज्यातील एक अग्रगण्य समजल्या अमरावती येथील 'श्री. शिवाजी शिक्षण संस्थे'चा पाया भाऊ साहेबांनी घातला. १० एप्रिल १९६५ रोजी भाऊसाहेबांचे निधन झाले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून पुढे महाराष्ट्र सरकारने २० ऑक्टोबर १९६९ रोजी त्याच्या नावाने अकोला येथे 'डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना केलीय.



**निमित्त**

देशाच्या सध्याच्या कृषी क्षेत्राच्या प्रगतीत देशाचे प्रथम कृषिमंत्री 'भाऊसाहेब' डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सिंहाचा वाटा आणि मोलाचे स्थान आहेय. शेती आणि मातीशी असलेले घट्ट नाते आणि या क्षेत्राचा भाऊसाहेबांना सूक्ष्म अभ्यास होतं. हीच गोष्ट लक्षात घेत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्य भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून डॉ.पंजाबराव देशमुख यांची निवड केली होती. भाऊसाहेबांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील सध्याच्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यातल्या पापळ या गावी झाला. डॉ. पंजाराव देशमुख यांचे वडील शामराव देशमुख हे हाडाचे शेतकरी. त्यामुळेच बालपणापासून पंजाबरावांना शेतीविषयी विशेष प्रेम. प्राथमिक शिक्षण गावात घेतल्यानंतर ते पुढे माध्यमिक शिक्षणसाठी कारंजा लाड आणि अमरावतीत येथे गेले. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी पुण्याच्या 'फर्ग्युसन कॉलेज' येथून पूर्ण केलेयट. पुढे १९२१ मध्ये इंग्लंडच्या जगप्रसिद्ध केम्ब्रीज विद्यापीठातून 'बैरिस्टर पदवी' उत्तीर्ण केली. येथेच त्यांनी संस्कृतमध्ये एम.ए. आणि पी.एच.डी.ची पदवी घेतली. त्यांना देशातील सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांचा कळवळा होता. त्यातूनच त्यांनी आपले पुढचे जीवन देशातील जनतेला समर्पित केले. १९३० मध्ये ते प्रांतीय कायदेमंडळाचे सदस्य म्हणून निवडून आलेत. ते यात शिक्षण मंत्री, कृषी व सहकार विभागाचे मंत्री बनले होते. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या विकास समितीचे सदस्य झालेत. १९५२, १९५७ आणि १९६२ असे सलग तीन टर्म्स ते खासदार म्हणून निवडून आलेत. तसेच ते १९५२ ते १९६२ असे दहा वर्ष ते देशाचे कृषीमंत्री होते. त्यांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी 'श्रद्धानंद वसतिगृह' सुरू केले. त्यांनी प्रसिद्ध श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज या संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर शैक्षणिक संस्था आणि वसतिगृहे यांचा समावेश आहे. या संस्थेच्या पश्चिम विदर्भात म्हणजे अमरावती विभागात अंदाजे ३१५ च्या वर शाळा आहेत. महाविद्यालये, अभियांत्रिकी पदवी, तसेच पदविका तंत्रनिकेतन, कृषी महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय अशी अनेक महाविद्यालये सुरू करून त्या संस्था शिक्षण क्षेत्रात फार मोठे योगदान देत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्पृश्य निवारण चळवळीत भाऊसाहेबांनी त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. यातूनच अमरावतीच्या 'आंबा मंदिरा'त दलितांना प्रवेश मिळविण्यासाठी त्यांनी सत्याग्रह केला होता. शेतकरी स्थिती सुधारणा करण्यासाठी त्यांनी 'भारत कृषक समाज' या संस्थेची स्थापन केली. त्यांनी समाजाचा अधिवक्ता असण्याचं धोरण राबविण्यासाठी 'महाराष्ट्र केसरी' हे वृत्तपत्र सुरू केले. डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी ७ फेब्रुवारी १९५५ रोजी भारत कृषक समाजाची स्थापना करून संपूर्ण शेतकरी समाजाला राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ निर्माण करून दिले.

**क्लिक...क्लिक...!**




अलिबाग : नाताळच्या सुट्ट्यांमुळे पर्यटक बच्चेकंपनीसह पर्यटनाला रायगडात आले आहेत. (छाया : जितू शिगवण)

## आरोग्य प्रहर

# दारूचं व्यसन सोडवायचंय? 'हे' उपाय करून पाहा...

दारू पिणं आरोग्यासाठी हानिकारक आहे हे माहीत असूनही अनेकांना दारू पिण्याचं व्यसन जडतं. अशा वेळी दारूच्या व्यसनापासून सुटका करून घेण्यासंदर्भात हैदराबादमधील अपोलो हॉस्पिटलचे कन्सल्टंट न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी काही उपाय सांगितले आहेत.



१) दारूचे व्यसन सोडण्याची इच्छाशक्ती आणि प्रेरणा ठेवा.

२) तुम्ही नियमितपणे दारू पिण्याचे कारण शोधण्याचा प्रयत्न करा. उदाहरणार्थ- नोकरीसंबंधित तणाव, आर्थिक समस्या, नातेसंबंधातील समस्या इ.

३) तुमचे दारू पिण्याचे व्यसन आणि ते सोडण्यासाठी तुम्ही करीत असलेल्या प्रयत्नांबाबत डॉक्टरांशी चर्चा करा.

४) दारू पिण्याची सवय हळूहळू कमी करा. कारण- ही सवय लगेच कमी करण्याचा प्रयत्न केल्यास तुम्हाला काही लक्षणं जाणवू शकतात. त्यामध्ये अस्वस्थता, चक्कर येणे, मळमळणे ही लक्षणं दिसू शकतात.

**दारूच्या व्यसनावर थेरेपी आणि समुपदेशन गरजेचे**

याबाबत तुम्ही मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घेऊ शकता. कारण- दारूच्या व्यसनावर थेरेपी आणि समुपदेशन हे खूप उपयुक्त ठरू शकते. यावर दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना मिरा रोडमधील वोक्हार्ट हॉस्पिटलचे कन्सल्टंट इंटर्नल मेडिसिन डॉ. अनिकेत मुळे यांनी नमूद केले की, अशा परिस्थितीचा सामना करीत असलेल्या महिलांच्या सपोर्ट ग्रुप्सशी संपर्क साधा. कारण- हा एक चांगला उपयोगी पर्याय आहे, ज्याद्वारे तुम्हाला दारूचे व्यसन सोडविण्यास मूदत होईल.

१) मानसोपचार तज्ज्ञांचा योग्य सल्ला घ्या. काही प्रकरणांमध्ये दारूच्या व्यसनापासून मुक्ती मिळविण्याच्या प्रक्रियेदरम्यान औषधे आवश्यक असतात.

३) दारूच्या व्यसनापासून मुक्ती मिळविण्यासाठी तुम्ही तुमचे आवडते छंद जोपासू शकता. कारण- तुमच्या आवडत्या गोष्टींमध्ये मन रमवल्यास तुम्हीचे लक्ष इतर गोष्टींकडे तितके जाणार नाही.

४) चांगले मित्र-मैत्रिणी आणि नातेसंबंध जोपासा; ज्यामुळे तुम्हाला सकारात्मक वाटू शकते. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी पौष्टिक स्नॅक्सचे सेवन करा. अशा प्रकारे काही गोष्टी काटेकोरपणे करायला सुरवात केल्यावर कालांतराने दारूचे व्यसन सुटण्यास मदत होईल.

# सुधागडच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध -आ. रविशेठ पाटील

**पाली : प्रतिनिधी**

राजकीय व सामाजिकदृष्ट्या सुधागडच्या जनतेने मला भरभरून प्रेम दिले आहे. सुधागडच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी पालीत नागरी सत्काराचे वेळी केले. यापुढे कोणतीही निवडणूक लढविणार नाही, असेही त्यांनी या वेळी जाहीर केले

पालीतील प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान तर्फे प्रकाशभाऊ देसाई ,सिने अभिनेते प्रशांत दामले यांच्या हस्ते व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत नागरी सत्कार सोहळ्यात आमदार रविशेठ पाटील पुढे म्हणाले की प्रकाशभाऊ देसाई यांच्या पुढाकाराने नाट्यचळवळ टिकविण्याचे मोठे काम केले आहे.ग्रामीण भागात राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धांना उदंड प्रतिसाद पाहून माझ्यासारख्या कार्यकर्त्यांच मन भरून आले. कारण ग्रामीण भागात आता नाट्यप्रयोग, एकांकिका चे प्रमाण कमी झाले आहे. शहरी भागात ही नाट्यगृहे बंद पडत चालली आहे. अशात प्रकाशभाऊ देसाई व त्यांच्या सहकाऱ्यांमुळे सुधागड सारख्या दुर्मिळ गावांना राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धांचा आस्वाद घेता आला. सुधागडने मला राजकीय दृष्ट्या भरभरून प्रेम दिले आहे. सुधागडचे पाच वर्षात कुठलेही गावांना जोडणारे रस्ते अपूर्ण राहणार नाहीत. पाच वर्षात जास्तीत जास्त चांगली कामे करणार आहे. कारण यापुढे मी कोणतीही निवडणूक लढविणार नाही, असे आमदार रविशेठ पाटील यांनी सत्कार सोहळ्यात जाहीर केले.

प्रतिष्ठानचे प्रकाश देसाई म्हणाले आमदार रविशेठ पाटील यांचे सुधागडच्या विकासात्मक जडणघडणीत महत्वपूर्ण योगदान लाभले आहे. सुधागड मध्ये दुर्गम, डोंगराळ माळरान पठार या ठिकाणी रस्त्यांचे त्यांनी यशस्वी रित्या जाळे विणले. गावोगावी रस्ते पोहचवले त्याचे फलित म्हणून त्यांना जनतेने विकासासाठी पुन्हा विधानसभेत पाठवले. आदिवासी बांधवांना त्यांनी खावटी वाटप केले. सुधागडच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच झुकते माप दिले व यापुढेही देत राहतील असा विश्वास व्यक्त केला.

शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाचे वाणिज्य विभागाचे प्राध्यापक संतोष भोईर यांना वसंतस्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार –२०२४ प्राप्त झाल्याने प्रतिष्ठानच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. या वेळी प्रकाश देसाई, भाजपच्या गीता पालरेचा, राजेश मपारा, रवींद्र लिमये, पाली तहसीलदार उत्तम कुंभार, पोलीस उपविभागीय अधिकारी रवींद्र दौडकर, पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण, शिल्पा लिमये, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, संदेश शेवाळे, आलाप मेहता, रवींद्र घोडके,वैशाली मपारा, सुशील शिंदे , प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव, सर्व पदाधिकारी सभासद आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**प्रकाश देसाई प्रतिष्ठानतर्फे पाली येथे भव्य नागरी सत्कार**



## नावात बदल

माझे जुने नाव **मिस मीनाकुमारी शिंदे, राहणार ३०१, शंकर रेसीडेन्सी, प्लॉट नं १७०, सेक्टर १०, खारघर, नवी मुंबई. रायगड महाराष्ट्र – ४१०२१०** हे माझे जुने नाव असून मी नोटरी क्र. ४७९४ दि. २५/१२/२०२४ रोजी श्रीमती मीना तानाजी गुंजाटे असे बदलले असून, या पुढे मी या नवीन नावाने ओळखली जाईल.

**दि. २५/१२/२०२४**

**सही/–**
**नवीन नाव**
**श्रीमती मीना तानाजी गुंजाटे**

## PUBLIC NOTICE

This is to inform to the general public that, (1) SMT.PUSHPA JAGANNATH KANDPILE, (2) SHRI DEEPAK JAGANNATH KANDPILE (3) SHRI GAURESH DEEPAK KANDPILE partners of M/S KANDPILE BROTHERS, having address at PLOT NO.86, PANVEL INDUSTRIAL CO-OPERATIVE ESTATES LTD., PANVEL Pin - 410206 have given notice to the partnership firm that

As per partnership deed dated 24.02.1989, 1. MRS. PUSHPA JAGANNATH KANDPILE, (2) SHRI DEEPAK JAGANNATH KANDPILE (3)LATE KIRAN JAGANNATH KANDPILE were carrying on the business, as per this deed "late JAGANNATH GANGARAM KANDPILE EXPIRED ON 15.5.1988, THIS ORIGINAL DEED MISPLACED BY US

All persons having any claim, against the said partners and/or any transaction done by the said partnership firm and any recovery of any amount against the said partners are required to notify the same in writing along with the supporting documentary evidence to the undersigned at the address given herein below within 14 days from the date hereof otherwise it will be deemed that there are no claims and/or that the same are waived accordingly

Dated- 27/12/24
(1) MRS. PUSHPA JAGANNATH KANDPILE,
(2) SHRI DEEPAK JAGANNATH KANDPILE
(3)SHRI GAURESH DEEPAK KANDPILE

**M/S KANDPILE BROTHERS**
Address: Plot No.86, Panvel Industrial Co – Operative Estate Ltd., Panvel, Pin - 410206

ताज्या बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी दै. रामप्रहर

## रोहा नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड
पिन कोड नं. ४०२१०९
email : rohanagarpalika@gmail.com

क्र. रोनप/बांवि/ई–निविदा सुचना/१३०८/२०२४–२५ दिनांक २६/१२/२०२४

### जाहिर ई–निविदा सूचना

रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई–निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई–निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/१२/२०२४ रोजीपासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक १६/०१/२०२५ रोजीपर्यंत राहील.

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**

## महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**
**जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, रायगड – अलिबाग**

✻ दूरध्वनी क्र. : ०२१४१–२२२११८/२२२०९७/२२२३२२/क्र. : ०२१४१–२२७४५१
✻ ✻ ई–मेल: tahasildarmahasul@gmail.com

क्र.मशा/जमीन/अ–२/माथेरान संनि.समिती./सल्लागार/नियुक्ती/ जाहिरात/२०२४ दिनांक –२६.१२.२०२४

### जाहिरात

**विषय: – माथेरान संनियंत्रण समिती करिता सल्लागार म्हणून नियुक्तीबाबत.**

या द्वारे अशी नोटीस जाहिर करणेत येते की, रायगड जिल्ह्यातील माथेरान आणि आजूबाजूच्या क्षेत्राचे प्रभावीपणे निरीक्षण करण्यासाठी तसेच संपूर्ण पर्यावरण क्षेत्राचे सर्वेक्षण करण्याचे अनुषंगाने माथेरान संनियंत्रण समितीमार्फत कामकाज केले जाते. त्याअनुषंगाने सदर माथेरान संनियंत्रण समितीच्या कामकाजाकरिता समितीस समन्वयक सल्लागाराची नियुक्ती करणेची आहे. याकरिता या कार्यालयास खालील शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारांची आवश्यकता असून, त्यानुसार अशा पात्र व इच्छुक उमेदवारांनी दिनांक ११.०१.२०२५ पर्यंत आवश्यक माहितीसह आपले अर्ज या कार्यालयास सादर करावेत.

१. उमेदवार हा Master In Science अगर पर्यावरण विषयासंदर्भात समकक्ष पदवी धारण करणारा असावा.
२. सदर उमेदवारांस इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक असून, संगणकातील Advance Technology चे ज्ञान असणे आवश्यक आहे.
३. सदर उमेदवारास पर्यावरण विषयक कामकाज करण्याचा पर्यावरणदृष्ट्या संवदेनशील क्षेत्रामध्ये कामकाज करण्याचा साधारणतः पाच ते सात वर्षांचा अनुभव असावा.

अशा पात्र उमेदवारांनी हि जाहिरात प्रसिध्द झालेपासून **दिनांक २७.१२.२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत आवश्यक माहिती व कागदपत्रांसह महसूल शाखा, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग येथे अर्ज सादर करावेत.** दिनांक ११.०१.२०२५ नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

- उमेदवारास माथेरान संनियंत्रण समितीमार्फत प्रतिमाह मानधन म्हणून रक्कम रु. २५,०००/– (अक्षरी रक्कम रु. पंचवीस हजार मात्र) अदा करणेत येईल.

**सही /–**
**(किशन ना. जावळे)**
**जिल्हाधिकारी रायगड**

**जिमाका/राअ/जाहि/१८४/२०२४–२५**

# नेने महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचा जल्लोष



**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन 'रिदम' मोठ्या जल्लोषात पार पडले. या समारंभासाठी प्रसिद्ध सिनेअभिनेते,लेखक,दिग्दर्शक राजन पांचाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या वेळी नेने महाविद्यालयाचे माजी अध्यक्ष ॲड. बापुसाहेब नेने, संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, प्राचार्य डॉ. सदानंद धारप आदींसह संस्थेचे सर्व पदाधिकारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ईशस्तवन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे उत्तम व्यासपीठ असल्याचे सांगत त्या निमित्ताने शिक्षक–विद्यार्थी यांतील दुरावा कमी होत असल्याने स्नेहसंमेलनाला आचार्य अत्रेंनी 'स्नेहमिलना'ची दिलेली उपमा सार्थ असल्याचे सांगितले.

प्रमुख अतिथी राजन पांचाळ यांनी विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद साधताना त्यांना रंगभूमी, पटकथा लेखन, व्हाईस आर्टिस्ट आदी क्षेत्रांत असलेल्या व्यवसायाच्या संधींबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी खडतर मेहनत हाच यशस्वी होण्याचा मूलमंत्र असल्याचे सांगितले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयाच्या प्रगतशील वाटचालीचा आढावा घेत यापुढील काळातही महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

या वेळी कला, क्रीडा, शिक्षण क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी ओम श्रीकांत मिसाळ (टी.वाय.बी.कॉम) व द्रीप मिलिंद लोखंडे (टी.वाय.बी.ए.) या वर्षाची आदर्श विद्यार्थी व आदर्श विद्यार्थीनी म्हणून मान्यवराच्यां हस्ते ट्रॉपी व प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आले.

दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगभूत कलागुणांचा परिचय देत मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यानंतर आभार प्रदर्शन होऊन समारंभाची सांगता झाली. या समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. यु. ए. खाडिलकर यांनी तर आभार प्रदर्शन कु. किमया पाटील हिने केले. या संपूर्ण समारंभाची धुरा रिदम–स्नेहसंमेलनाचे कार्याध्यक्ष व सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. पी. डी. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगांव

### निविदा सादर करण्याच्या मुदतीत वाढ

**शुध्दीपत्रक क्र. १**

ई निविदा क्र. ७ सन २०२४–२५ नुसार प्रसिध्द झालेल्या फणसाड प्रादेशिक पाणी पुरवठा ता. मुरूड, जि. रायगड, पंपींग मशिनरीसाठी तरंगता तराफा उभारणी करणे. कामाची अंदाजित किंमत रू. १,००,९७,२००/– या कामाच्या निविदा सादर करण्याच्या प्रक्रियेस दि. १७/१२/२०२४ पासुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याबाबतचा सविस्तर तपशिल दि. ३१/१२/२०२४ पासुन www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचना नुसार राहतील.

**दिनांक– १७/१२/२०२४**

**सही/–**
**(हेमंत नागदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, माणगांव.**

## जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीशी द्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, **मौजे चाणजे, ता.उरण, जि. रायगड** येथिल खालील वर्णनाची मिळकत **कै. बेबीबाई महादेव माळी यांचे वारसांतर्फे श्री. रमेश महादेव माळी व नंदा अशोक इंगळे** यांचे ताबेकब्जा व मालकी हक्क आहे. सदर मिळकत खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नु | मौजे | सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | चाणजे | २१४ | ५ | ०.३७.२० पो.ख ०.०२.५० |
| २ | चाणजे | २१५ | ३ | ०.०४.३० पो.ख.०.००.२० |

सदर मिळकती पैकी २८. ९६ हे. आर एवढया क्षेत्राचा मालकी हक्क असुन त्या संदर्भात एवढ्या क्षेत्राचे खरेदीखत व सातबारा एकपक्षीय यांचे नावे होण्यासाठी दुसरेपक्षीय यांनी पुर्णपणे संमतीदिलेली आहे . वर नमुद जमिन मिळकत ही उरण सब रजिस्टार यांचे अधिपत्या खालील आहे. वरिल नमुद मिळकत आमचे आशिलंना विकत घ्यायची आहे. सदरकामी आमचे अशील यांना वरील नमुद मिळकतीचे ताबे कब्जा धारक यांचे सोबत आमचे आशीलांना करारनामा करुन घ्यावयाचा आहे. वर नमुद मिळकती संदर्भात कोणाचाही हक्क, अधिकार असल्यास तसेच कोणत्याही प्रकारचा करार अथवा गहाण खत, खरेदी खत, साठे करार तसेच बंक्षीस पत्र अथवा इतर कोणताही करार झालेला असल्यास तसेच कोणाचेही सदरील मिळकती संदर्भात देणे लागत असल्यास अथवा कोणाचीही हरकत असल्यास ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी हरकती घेण्यात यांव्यात अथवा समक्ष येवुन भेटावे. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास कोणाचाही वर नमुद मिळकती मध्ये मालकी हक्क व अधिकार नाही असे समजले जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड. नेहा अ. नाईक**
**ऑफिस : गाळा नं. २, अर्श टॉवर, उरण कोर्टाच्या बाजुला, उरण जि. रायगड ४००७०२**

## दि पनवेल को अर्बन बँक लि.

**४७१, टिळक रोड, कापड बाजार, पनवेल–रायगड**
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८, १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ नुसार

### जाहीर लिलाव नोटीस

श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जाचा भरणा न केल्यामुळे सहकारी न्यायालय अलिबाग, रायगड यांच्या कडे दावा क्र. सीसी/आरजीडी/९०/२०२१ निशाणी क्र. ३८ दाखल करून बँकेने हुकुमनामा मिळविला आहे. सहकारी न्यायाल्याने सदरील व्यक्तीच्या मिळकती जप्त करून कर्ज रकमा, त्यावरील व्याज व त्यावरील अनुषंगिक खर्च वसूल करण्याचा हुकुम केला आहे. तसेच खाली सही करणाऱ्यानेसुद्धा वेळोवेळी आदेश काढून गहाण ठेवलेली मिळकत दिनांक. १३.०६.२०२३ रोजी जप्त केली आहे.

तरी सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री. देवचंद जनार्दन कोळी यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जासाठी खालील नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मिळकतीचा लिलाव जसे आहे आणि जेथे आहे त्या परस्थितीत सोमवार दि. ०३/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता बँकेच्या ४७१, टिळक रोड, कापड बाजार, पनवेल येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात करण्यात येणार आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन | एरिया |
|---|---|---|---|
| १. | श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील तक्का येथील शॉप नं. ११, तळमजला, श्री सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ४२२, तक्का गाव, ता. पनवेल जि. रायगड | ११.१५ स्क्वेअर मीटर (कारपेट एरिया) आणि ३.७२ स्क्वेअर मीटर (लॉप्ट एरिया) |

सदरील कर्जाची दि. ३१.०५.२०२४ पर्यंत थकबाकी रु.२१,३०,७०३/– (अक्षरी एकवीस लाख तीस हजार सातशे तीन रुपये मात्र) अधिक ०१.०६.२०२४ पासून पुढील होणारे व्याज अधिक होणारा खर्च. माननीय जिल्हा उपनिबंधक साहेब अलिबाग यांनी जरी त्यांच्या आदेशाने सदरील मिळकतीची अपसेट किंमत रु. २१,६०,०००/– एवढी मान्य केली आहे. परंतु सदर मिळकतीचा तीन वेळा लिलाव लावण्यात आला असून सदर लिलावास कोणीही भाम न घेतल्याने सदर लिलाव हे स्थगित करण्यात आले होते. मा जिल्हा उपनिबंधक अलिबाग यांच्या दि. ३०.०५.२०२४ अनुसार मान्यताप्राप्त मुल्यांकनकर्ता यांचेकडील डिस्ट्रेस व्हॅल्यु रु.१६,२०,०००/– एवढे मुल्यांकन करून दिले आहे त्यामुळे त्यापेक्षा कमी रकमेची बोली रक्कम स्वीकारली जाणार नाही. लिलावातपरंतु भाग घेणाऱ्यांनी इसारा रक्कम बँकेच्या नावाने बँकेत अनामत रक्कम म्हणून पनवेल अर्बन बँकेच्या खात्यामध्ये रु.८१,०००/– वरील लिलावाच्या तारखेच्या किमान ५ दिवसापूर्वी (कामकाजाच्या दिवशी) भरणा करावा लागेल जास्तीत जास्त बोली लिलावामध्ये मंजूर केली जाईल. बँकेने दैनिक रामप्रहार मध्ये दि. ३०.११.२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार श्री. गजानन शिवसिंग पाटील, अमेय श्रीकांत ठगे, मोहनसिंग शिवसिंग पाटील यांनी सदर इसारा रक्कम भरून लिलावामध्ये सहभाग घेऊन ऑफर प्राईज वे सीलबंद लिफाफे बँकमध्ये दाखल केले होते. परंतु मागील लिलावास स्वतः कर्जदार श्री. देवचंद जनार्दन कोळी हे हजर राहून त्यांनी त्यांच्या कर्जाची रक्कम पूर्ण भरण्याची हमी घेतली होती. हमी घेते वेळी त्यांनी बँकेत सदर इसारा रक्कम रु.८१०००/– भरून आठ दिवसात कर्ज रकमेच्या २५% रक्कम भरण्याचे कबुल केले होते, पैसे न भरल्यास प्रथम लिलावाचे प्राधान्य दि.१६.१२,२०२४ रोजी सहभाग घेतलेल्या व्यक्तीना देण्यात यावा असे लेखी लिहून बँकेस दिले होते. तथापी त्यांनी कर्जदार श्री. देवचंद कोळी यांनी त्यांच्या कर्जाची २५% रक्कम विहित मुदतीमध्ये भरणा केलेली नाही. त्यामुळे शुक्रवार दि. ०३.०१.२०२५ रोजी सदर मिळकतीचा लिलाव करण्याचे ठरले आहे. सदर लिलावास श्री. गजानन शिवसिंग पाटील, अमेय श्रीकांत ढगे, मोहनसिंग शिवसिंग पाटील यांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

कोणतेही कारण न देता लिलाव मंजूर करणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार वसुली व विक्री अधिकारी यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे. लिलावाच्या बाकीच्या सर्व अटी व नियम शाखाधिकाऱ्यांकडे व खालील सही करणाऱ्यांकडे उपलब्ध आहेत व त्या बँकेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आणि त्या लिलावामध्ये भाग घेणाऱ्यांस बंधनकारक आहेत याची नोंद घ्यावी.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक : २६.१२.२०२४.**

**सही/–**
**वसुली व विक्री अधिकारी**
दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल

## जगदीश दगडे यांच्याविरोधात गुन्हा

**कर्जत : प्रतिनिधी**

यु ट्युब चॅनलचे संपादक जगदीश दगडे विरोधात त्याच्या दुसर्या पत्नीने कर्जत पोलिस ठाण्यात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम अधिक तपास करीत आहेत.

जगदीश दगडे याने पहिल्या पत्नीला घटस्फोट देऊन दुसरा आंतरजातीय विवाह केला आहे ही पत्नी मागासवर्ग समाजातील आहे तिला त्रास देण्याचे व अपमान करण्याचे उद्देशाने शारीरिक व मानसिक छळ करून तिला जातीवाचक शिवीगाळ करून खोट्या केसमध्ये फसवण्याची धमकी देऊन मारहाण करण्यात आल्याची घटना गौळवाडी येथे घडली आहे.

याबाबत पिडीत महिलेने कर्जत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी मुख्य आरोपी जगदीश दगडे रा.कर्जत ह्याच्यासह गणेश दगडे, सुषमा दगडे, राकेश दगडे रा.लाडिवली,निमिश दगडे, सिध्दी दगडे, ललित जगदीश दगडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## TENDER NOTICE

Sahyadri CHS, building no. E-1/06 to E-1/10 Plot no.2 Sector-14 New Panvel (E)

### OFFER NOTICE

| | |
|---|---|
| Name of Organization | SAHYADRI CHS Ltd New Panvel (E) |
| Name of Work | Proposed Redevelopment of Existing Building at E1 type Building no 6 to 10. Plot no. 02. Sector no. 14, condominium 2, New Panvel (E), Dist- Raigad 410206 |
| App. Cost of Project | 93.202 CR. |
| COST of Offer Document | Rs. 25,000/- Rs. (Twenty five thousand) D.D. in a favour of Sahyadri CHS from Nationalised Bank, Mumbai clearance) |
| Bid Security Deposit - EMD (Unsuccessful bidders EMD will be refunded after 60 days after MOU with successful developer) | Rs. 25,00,000/- by D.D. from Nationalised Bank, Mumbai clearance D.D's shall be issued in the name of SAHYADRI CO-OP HOUSING SOCIETY LTD, NEW PANVEL |
| Date of issue and sale of Tender | From 02/01/2025 to 17/01/2025, 11:00 AM To 06:00 PM (on all working days only) At Sheshnath & Associates, Office no. 111 & 113. Prabhat Centre Annexe Plot no. 7.Sector no. 1 A. C.B.D Belapur |
| Pre bid meeting (after written request by bidder) | 09/01/2025 from 7.00 pm to 9.00 pm at Sahyadri CHS office. |
| Last date of Submission | 23/01/2025 up to 3.00 pm. |
| **Project Management Consultant Sheshnath & Associates Architect & Interior Designer 111 & 113, 1st floor, Prabhat Centre Annexe Plot no. 7 Sector 1A. CBD Navl Mumbal Mob: 8169295337/7977298524** | Sahyadri Co.op Housing Society Ltd (New Panvel (E) Bldg. no £-1/6 to E-1/10 Conclenium-02 Plot no 2 Sector-14 New Panvel Dist Raigad. 410206 |

**Sahyadri CHS Ltd.**

| sd/- | sd/- | sd/- |
|---|---|---|
| President | Secretary | Treasurer |

# नवी मुंबईतील होल्डिंग पाँडच्या पुनर्जिवीकरणासाठी गतीमान कार्यवाही



**नवी मुंबई : बातमीदार**

शहर समुद्र सपाटीपासून खालच्या पातळीवर वसलेले असल्याने विशेषत्वाने पावसाळी कालावधीत समुद्राच्या भरतीचे पाणी साठवून ठेवण्यासाठी सिडकोने नवी मुंबई वसविताना डच पध्दतीने धारण तलावांची (होल्डिंग पाँड) रचना केली आहे. बेलापूर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे, ऐरोली विभागांमध्ये ११ होल्डींग पाँड तयार करण्यात आले असून सेक्टर १२ बेलापूर व सेक्टर ८ वाशी येथे होल्डिंग पाँडलगत पर्जन्य जलउदंचन केंद्र बांधलेले आहेत. तुर्भे सेक्टर २१ एपीएमसी मार्केटजवळही पर्जन्य जलउदंचन केंद्र कार्यरत असून हे केंद्र परिसरातील सखल भागातील पावसाळी पाणी निचरा होण्याकरिता उपयुक्त आहे.

उर्वरित होल्डिंग पाँडच्या ठिकाणी फ्लॅपगेट बसविण्यात आले असून ते खाडीच्या दिशेने उघडतात. ज्यावेळी खाडीत भरतीची वेळ असेल आणि त्याचवेळी मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असेल तर हे फ्लॅपगेट खाडीच्या पाण्यातील दबावामुळे बंद होतात व पावसाचे पाणी होल्डिंग पाँडमध्ये साठून राहते आणि शहरात शिरत नाही. ज्यावेळी ओहोटी सुरू होते तेव्हा होल्डिंग पाँडमध्ये साठलेल्या पावसाळी पाण्याच्या दबावामुळे फ्लॅपगेट खाडीच्या दिशेने उघडतात व होल्डिंग पाँडमधील साठलेले पावसाळी पाणी खाडीमध्ये वाहून जाते. अतिवृष्टी होत असेल अशावेळी पर्जन्य जल उदंचन केंद्रामधील पंपाव्दारे पावसाचे पाणी उचलून खाडीमध्ये सोडण्यात येते.

तथापि पावसाळ्यात ज्या होल्डिंग पाँडमुळे नवी मुंबई शहराचे पावसाळी पाण्यापासून संरक्षण होते, अशा होल्डिंग पाँडची पावसाचे पाणी धारण करण्याची क्षमता ही इतक्या वर्षात त्यामध्ये मोठया प्रमाणात गाळ साचल्याने व पाण्यात वाहत आलेल्या खारफुटींचीही वाढ झाल्याने मोठया प्रमाणात कमी झाली आहे. त्यामुळे मागील काही वर्षात उधाण भरतीची वेळ व मोठया पर्जन्यवृष्टीची वेळ जुळून आल्यास होल्डिंग पाँडची पावसाळी पाणी साठवून ठेवण्याची क्षमता अत्यंत कमी झाली असल्याने ते पाणी शहराच्या सखल भागात जमा होत असल्याचे निदर्शनास येत आहे

याकरिता होल्डिंग पाँड गाळ काढून स्वच्छ करणे व त्याची पाणी धारण क्षमता वाढविणे हा उपाय असून याकरिता परवानगी मिळावी यादृष्टीने महापालिकेच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. यावर्षीही पावसाळी कालावधीत २१ जुलै २०२४ रोजी दुपारी अतिवृष्टी आणि उधाण भरती यांचा कालावधी जुळून आल्याने शहरातील काही सखल भागात पाणी साचल्याचे निदर्शनास आले.

या वेळी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विविध ठिकाणांना भेट देत परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली व आपत्कालीन मदतकार्याला गती दिली. लगेच दुसऱ्या दिवशी सकाळीच आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी पाणी साचलेल्या ठिकाणांची स्थलदर्शक पाहणी केली व नागरिकांशी संवाद साधत पाणी साचण्याची कारणमीमांसा जाणून घेतली. त्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने त्वरित आवश्यक उपाययोजना करण्यासाठी नमुंमपा पर्यावरण विभागामार्फत आयआयटीमधील तज्ज्ञांसोबत विशेष बैठक आयोजित करण्यात आली व या तज्ज्ञांनीही पाणी साचलेल्या ठिकाणांची व त्या परिसरातील नाले आणि होल्डिंग पाँडची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणीमध्ये आढळलेल्या बाबींच्या अनुषंगाने होल्डिंग पाँड स्वच्छतेचे महत्व लक्षात घेऊन व ते तातडीने करण्याची आवश्यकता बघून महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार आयआयटी मुंबईचे तज्ज्ञ प्रा.व्ही. ज्योती प्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली या क्षेत्रातील तज्ज्ञ सल्लागारांची विशेष समिती १६ ऑगस्ट २०२४ रोजी गठीत करण्यात आली. यामध्ये नवी मुंबई शहर वसविणाऱ्या सिडको महामंडळाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात आला.

नवी मुंबई शहरातील होल्डिंग पाँडची पाणी धारण क्षमता पूर्ववत करण्याकरिता मार्ग काढण्यासाठी या सल्लागार समितीच्या तीन बैठका आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आल्या असून या कामाला गती देण्यात येत आहे.

## महापालिकेतर्फे जलद पावले

कार्यवाही जलद करून घेण्याकडे नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे बारकाईने लक्ष असून शहर अभियंता विभागामार्फत कालबध्द कार्यवाही करण्याकरिता नियोजन करण्यात आलेले आहे. नवी मुंबईचे सुरक्षा कवच मानले जाणारे होल्डिंग पाँड हे सागरी पर्यावरणाची कोणत्याही प्रकारची हानी न होता स्वच्छ व्हावेत व नवी मुंबईकर नागरिकांना पावसाळी काळात अतिवृष्टीच्या वेळी होणारा त्रास होऊ नये याकरिता महापालिकेच्या वतीने जलद पावले उचलण्यात येत आहेत.

## तांत्रिक सल्लागाराची नेमणूक

होल्डिंग पाँडची गाळ काढून स्वच्छता करणे ही बाब मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या पटलावर असून आयआयटी मुंबई आणि सलीम अली पक्षी विज्ञान व प्रकृती विज्ञान केंद्र यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी हे काम तांत्रिक प्रकारचे विशिष्ट स्वरूपाचे असल्याने तसेच होल्डिंग पाँडची साफसफाई व पुनरुत्थान करण्यासाठी आवश्यक माहिती संकलित करावयाची असल्याने यासाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे.

# माथेरान डोंगरातील दुसरा बोगदा पूर्णत्वाकडे



## जुलै २०२५पर्यंत खुला होण्याची शक्यता

**पनवेल : वार्ताहर**

बडोदा मुंबई महामार्गाच्या माथेरान डोंगरातील दुसऱ्या बोगद्याचे खोदकाम आरपार झाल्याची माहिती मिळत असून सध्या या मार्गावर युद्धपातळीवर रस्त्याचे बांधकाम सुरू असून जुलै २०२५ पर्यंत हे काम पुर्ण करण्याच्या जोरदार हालचाली प्राधिकरणाकडून सुरू आहेत. या दुहेरी बोगद्यामुळे आणि प्रशस्त महामार्गामुळे काही मिनिटांत बदलापूर येथील नागरिकांना पनवेल, उरण जेएनपीटी बंदरामध्ये आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पापर्यंत पोहचता येणार आहे.

सिडकोची दक्षिण नवी मुंबई म्हणजेच नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्राला (नैना) थेट दिल्लीशी जोडणारा मुंबई बडोदा या महामार्गामुळे पनवेल नगरीचे अर्थकारण बदलणार आहे. बांधकाम पुर्ण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कंबर कसली आहे. सूमारे सव्वा चार किलोमीटर अंतरावर दुहेरी बोगद्याचे काम ६० टक्के पुर्ण झाले आहे. तसेच हा महामार्गाचे शेवटच्या पॅकेज क्रमांक १७ चे सरासरी ४५ टक्के काम पुर्ण झाले आहे. यासाठी १४०० कोटी रुपये खर्च केला जात आहे. पावसाळा संपल्यावर पुन्हा एकदा कामाने गती पकडली आहे. दुहेरी बोगदा आरपार करण्याचे काम ठरविलेल्या मुदतीपेक्षा अगोदर पुर्ण झाल्याने प्राधिकरणाच्या कामाविषयी समाधान व्यक्त केले जात आहे.

पॅकेज १७ हा ९.६ किलोमीटर अंतराचा असून बदलापूरच्या भोज गावापासून ते पनवेलमधील मोरबे गावापर्यंत हा रस्ता बांधला जाणार आहे. यामध्ये ४.३९ किलोमीटरचे दुहेरी भोगदे माथेरान डोंगररांगांखालून खोदले आहेत. १३ मीटर उंच आणि २३ मीटर रुंदीच्या या दुहेरी बोगद्यात आठ वेगवेगळ्या मार्गिका असतील. विरार अलिबागचे भूसंपादनच रखडलेले बडोदा मुंबई महामार्गाचे पॅकेज क्रमांक १७ चे बांधकाम पुढील नऊ महिन्यांत पुर्ण करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत, मात्र या पॅकेजनंतर हा महामार्ग विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेला पनवेलच्या मोरबे गावाजवळ जोडला जाणार आहे.

# लायन्स क्लब ऑफ सरगमतर्फे आंतरशालेय कराओके गायन स्पर्धा

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे रविवार दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता आंतर शालेय कराओके गायन स्पर्धा बांठीया विद्यालय, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आल्या आहेत.

सदर स्पर्धा पाचवी ते सातवी आणि इ. ८वी ते १०वी अशा २ गटात होणार आहेत. स्पर्धेसाठी प्रवेश फी २०० रुपये असून प्रत्येक स्पर्धकाला मराठी किंवा हिंदी गाण्यांचा १ मुखडा आणि अंतरा सादर करायचा आहे. विजेत्यांना रोख बक्षीस आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात येईल तसेच प्रत्येकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रत्येक स्पर्धकाने आपल्या गाण्याचा ट्रॅक मोबाईल मध्ये आणायचा आहे.

नाव नोंदणीची अंतिम तारीख ३ जानेवारी असून नाव नोंदणीसाठी (९८१९६५४४१९) किंवा (९८२०९७४७१५) या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन अध्यक्ष मानदा पंडित यांनी केले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे करिअर मार्गदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागातर्फे २३ डिसेंबर रोजी करिअर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन केले होते.

या करिअर मार्गदर्शनसाठी प्रा. शुभम शर्मा व संगणक व माहिती व तंत्रज्ञान विभागातील इतर सर्व प्राध्यापक यांनी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले तसेच भविष्यामध्ये वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या करिअरच्या संधी याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल संगणक व माहिती व तंत्रज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी यांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे व प्रा. रिजवाना मोमीन यांनी केले तसेच विभागातील इतर सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# दिवाळे कोळीवाडा ते एकवीरा पदयात्रा

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथील दिवाळे कोळीवाड्यातील आई एकवीरा देवी पदयात्रा मंडळ आणि दिवाळे ग्रामस्थ मंडळ यांच्या वतीने दिवाळे कोळीवाडा ते कार्ला लेणी आई एकवीरा देवी मंदिर अशी तीन दिवसीय 'दिवाळे कोळीवाड्याची मानाची पालखी' अंतर्गत पदयात्रा काढण्यात येणार आहे, मात्र या पालखी सोहळ्याच्या आधी मंगळवारी (दि.२४) परिसरातील श्री. साई कला सर्कल ब्रास ब्रॉण्ड पथकांच्या गजरात पदयात्रा पालखी सोहळ्यासाठी लागणाऱ्या देवीच्या मुखवट्याचे स्वागत करून मिरवणूक काढण्यात आली होती.

आगरी – कोळी बांधवांची कुलदैवत असणाऱ्या आई एकविरा देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी नवी मुंबईतील विविध भागातून हजारो भक्तगण पायी जात असतात. यंदा दिवाळे कोळीवाडा येथून १९ जानेवारीला पायी निघणार असून २२ जानेवारी रोजी कार्ला गडावरील आई एकवीरा देवी मंदिर परिसरात पोहचणार आहे. या तीन दिवसीय पदयात्रेसाठी पंचक्रोशीतील ६०० हून अधिक देवी भक्तांनीं सहभाग नोंदवला आहे. या पालखी सोहळ्याचे पहिले वर्ष असून या पदयात्रेसाठी अनेक सेवाभावी संस्थांनी आपले योगदान दिले आहे.



दरम्यान, हा तीन दिवसीय पदयात्रा सोहळा भक्तीभावाने पार पडण्यासाठी दिवाळे ग्रामस्थ एकत्रित येत पालखी प्रस्थानासह मार्गक्रमण व पदयात्रीना राहण्यासह जेवणाची व्यवस्था करण्याची जय्यत तयारी सुरू आहे. विशेष म्हणजे या पदयात्रेला सर्व कोळी बांधव आपली पारंपरिक वेशभूषा करून ब्रास बॅण्डच्या ठेक्यावर ताल धरून सहभागी होणार आहेत. त्यामुळे या पदयात्रेदरम्यान कोळी संस्कृतीचे खऱ्या अर्थी दर्शन होणार आहे.

तसेच, माणसाला माणसासोबत जोडण्याचे काम हि पदयात्रा करीत आहे. आणि आज त्याची प्रत्येकाला गरजही आहे. आशा पदयात्राच मानवतेची आशा आहे, जेथे आशा तेथे विश्वास आहे व जेथे विश्वास तेथे सफलता आहे. अशा पदयात्रा एकात्मतेच्या भावनेचा अलख जागवणार असून, अशा पदयात्रांमध्ये प्रत्येकाने सहभागी झाले पाहिजे, असे मत आई एकवीरा पदयात्री मंडळाने व्यक्त केले.

# जेएनपीएचा टर्मिनल इन्व्हेस्टमेंट लिमिटेड एसएआरएलसोबत करार



**उरण : वार्ताहर**

जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण (जेएनपीए) बंदराने सोमवारी (दि.२३) टर्मिनल इन्व्हेस्टमेंट लिमिटेड एसएआरएल (टीआयएल) सोबत महत्त्वपूर्ण सहयोग स्थापित करून वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेडच्या बांधकामासाठी सामंजस्य करार केला आहे.

ही भागीदारी भारतातील बंदर पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी आणि वाढवण बंदराला भविष्यातील जागतिक दर्जाचे बंदर बनवण्यासाठी जनेप प्राधिकरणाचे समर्पण दर्शवते. त्यावर जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ आणि सीएमडी, वाप प्रकल्प लिमिटेड व कॅप्टन दीपक तिवारी स्वाक्षरी केली.

सामंजस्य करारानुसार टीआयएलने वाढवण बंदर आणि आसपासच्या परिसंस्थेच्या विकासासाठी अंदाजे २०,००० कोटी गुंतवण्याचा प्रस्ताव दिला आहे. टर्मिनल इन्व्हेस्टमेंट लिमिटेड एसएआरएल सह, भारताच्या सागरी विकासासाठी आपली दृढ वचनबद्धता प्रदर्शित करत आहे. टीआयएल, स्वित्झर्लंडच्या बाहेर स्थित, कंटेनर टर्मिनल्सचा वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ आहे, जो धोरणात्मकदृष्ट्या जगातील प्रमुख शिपिंग मार्गांवर प्रमुख बंदरांवर स्थित आहे, मुख्य परिपक्व आणि विकसनशील बाजारपेठांमध्ये प्रवेश प्रदान करतो.

या वेळी बोलताना जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ आणि सीएमडी वाप प्रकल्प लिमिटेड म्हणाले की, टर्मिनल इन्व्हेस्टमेंट लिमिटेड एसएआरएल सोबतचा सामंजस्य करार हा आमच्या दृष्टीकोनात भारतातील बंदराच्या पायाभूत सुविधांना पुनर्परिभाषित करण्यासाठी तयार असलेल्या वाढवण बंदरासाठीचे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही भागीदारी केवळ भारताच्या सागरी क्षेत्रातील जागतिक गुंतवणूकदारांचा विश्वास दर्शवत नाही तर अत्याधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत पद्धती आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचे एकत्रिकरण सुनिश्चित करते. कार्यक्षमतेत आणि नावीन्यतेमध्ये नवीन मापदंड स्थापित करणारी पत्तन परिसंस्था तयार करण्याचे आमचे ध्येय आहे.

वाप प्रकल्प लिमिटेडने नुकतेच वाढवण पत्तन कौशल्य कार्यक्रम सुरु केला आहे जो वाढवण विभागातील तरुणांकरता तयार केलेला आहे. निवडक सागरी प्रशिक्षण संस्था (एमटीआयएस)मार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी नौवहन महानिदेशालय आणि जनेप प्राधिकरण यांच्यात सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

# भारतरत्न अटलजी भाजपचे दीपस्तंभ होते -रामचंद्र घरत

**नवी मुंबई : बातमीदार**

हिंदुत्ववादी विचारसरणी देशभरात रुजविण्याचे काम भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांनी अविरतपणे केले. अटलजी सारख्या महान पूर्वज्यांच्या पुण्याईचे फलित आपण आज अनुभवत असून भारतीय जनता पक्ष आज भारतातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यागी, प्रखर राष्ट्रभक्त, प्रखर हिंदुत्ववादी असणारे महान नेते अटलजी भाजपचे दिपस्तंभ होते, असे गौरोदगार भाजपचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष रामचंद्र घरत यांनी काढले.

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची १०० वी जयंती नवी मुंबई भाजप जिल्ह्याच्या वतीने नेरूळ येथील भाजपा कार्यालयात मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी व्यासपीठावर नवी मुंबई सरचिटणीस डॉ. राजेश पाटील, भाजप ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष राजेश पाटील, जयश्री चितळे, दर्शन भारद्वाज, सुरेश अहिवले, श्रीमंत जगताप आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना जिल्हा अध्यक्ष रामचंद्र घरत यांनी सांगितले की, अटलजींनी आपले संपूर्ण आयुष्य आरएसएस, जनसंघ आणि भाजपाच्या माध्यमातून हिंदुत्वाच्या प्रचार आणि प्रसारासाठी घालविले. त्यांनी मोठ्या कष्टाने आणि खडतळपणे प्रचारक म्हणून संपूर्ण देशभ्रण केले. आणीबाणीच्या काळात तुरुंगावास भोगला, अश्या त्यागी आणि देशप्रेमी महान नेत्यामुळे आपण चांगले दिवस अनुभवत असल्याचे रामचंद्र घरत यांनी सांगितले. या वेळी भाजपच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.






# वृद्धांना भोजनदान व ब्लॅंकेट वाटप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल नवी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती महाराष्ट्रीयन बिल्डरचे सरचिटणीस तुकाराम दुधे यांनी आपल्या माता पित्याच्या पुण्यतिथी निमित्त बुधवारी (दि.२५) सकाळी घरी पूजा अर्चना करून नेरा येथील स्नेहकुंज आधारगृहमधील वृद्धांना भोजनदान व ब्लॅंकेट वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला दुधे परिवारातील तुकाराम दुधे त्यांची बहीण मेव्हणे पत्नी सुरेखा दुधे मुलगा विकी दुधे मुलगी जोत्सना दुधे, मुलगी दिपीका दुधे–देशपांडे जावई मिहीर देशपांडे यांच्यासोबत मित्र मांडली. प्रमोद वरोका, प्रदीप ठाकरे, सिद्धाराम भालेराव तसेच पत्रकार शंकर वायदंडे, पत्रकार गणपत वारगडा, संविधान वाघमारे आदी सह स्नेहकुंज आधार वृद्धाश्रमचे नितीन जोशी संगीता जोशी आणि दुधे यांचा कर्मचारी वर्ग उपस्थित राहून अन्नदान केले.

# एक्स्प्रेस वेवर वाहतूक कोंडी

## बोरघाटात अमृताजन ब्रिज, अंडा पॉईंट जाम

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर बोरघाटातील अमृतांजन ब्रिज आणि अंडा पॉईंटजवळ मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. सकाळीच मोठ्या संख्येने वाहने द्रुतगती महामार्गावरून बोरघाटातून लोणावळा खंडाळा व कोल्हापूर कोकण असा वर्षाचा शेवट करण्यासाठी व सुट्टी एन्जॉय करण्याचा बेत आखत मुंबई बाहेर पडल्याने वाहनांची संख्या अचानक मोठ्या संख्येने वाढल्याने ट्राफीक जामचा सामना करावा लागला.



२५च्या आसपास वाहनांचे लायनर गरम होऊन निकामी झाले तर काही वाहनांच्या क्लजप्लेट खराब झाल्याने वाहने मार्गामध्येच बंद पडल्याने बोरघाटातील वाहतूक मंदावली तर अमृतांजन पुल व शिंग्रोबा मंदिर जुन्या महामार्गावरील अंडा पॉईंट येथे वाहतूक ठप्प झाली होती.

इयर एंड आणि सार्वजनिक सुट्ट्या यामुळे ट्रॅफिक वर परीणाम झाला असल्याचे पोलिसांनी सांगितले. सलग सुट्ट्या असल्याने मुंबई ठाणे नवी मुंबई मधील पर्यटक मुंबई बाहेर पडत कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील देवदर्शनासाठी तसेच लोणावळा खंडाळा एन्जॉय करण्याचा बेत आखला यामुळे मुंबई पुणे द्रुतगती व जुन्या महामार्गावर वाहनांची संख्या मोठ्या संख्येने वाढली. बोरघाटात वाहनांची वर्दळ अचानक वाढल्याने वाहतूकीवर याचा परिणाम होत वाहतूक संथगतीने व काही ठिकाणी ठप्प झाली होती.

बोरघाट वाहतूक पोलिसांनी वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेतली असली तरी वाहनांची संख्या अचानक वाढल्याने वाहतूक संथ गतीने सुरू होती. संध्याकाळी बोरघाटात वाहतूक धिम्या गतीने सुरू होती.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-पुणे जुना महामार्ग वाहनांची संख्या वाढल्याने या मार्गावर बोरघाटात ट्राफिक जामचा सामना वाहन चालकांना करावा लागला. रविवार आणि दोन दिवसांवर येऊन ठेपलेला ख्रिसमस याची सांगड घालून मुंबई नवी मुंबई ठाण्यातील पर्यटक कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील देवदर्शनासाठी तसेच लोणावळा खंडाला पर्यटन करण्यासाठी निघाल्याने खालापूर टोल नाक्याच्या पुढे बोर घाटात वाहनांची संख्या अचानक वाढल्याने हा महामार्काग ही काळ संथगतीने सुरू होता तर अर्धा तास वाहतूक ठप्प होती.

# रायगडात नाताळ उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

ख्रिश्चन बांधवांमध्ये नाताळ सणाला विषेश महत्त्व असले तरी सर्वधर्मीयांमध्ये हा सण उत्साहात साजरा केला जात आहे. जिल्ह्यातील चर्चमध्ये नाताळनिमित्त लगबग पहायला मिळत आहे. बुधवारी सकाळपासूनच बाजार पेठाही ख्रिसमस ट्री, जिंगल बेल्स, चांदण्या, अशा सजावटीच्या वस्तूंनी भरल्या आहेत. याची क्रेझ थर्टी फर्स्टपर्यंत राहणार आहे.

अलिबाग, कोर्लई, नागोठणे येथील चर्चवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रात्री चर्चमध्ये प्रार्थना करण्यासाठी ख्रिश्चन बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले होते. त्यानंतर येशूच्या जन्माचा सोहळा पार पडला. या वेळी, सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. तर ख्रिसमस ट्री, रंगीबेरंगी पताकांनी पार्टी हॉल सजविण्यात आले होते. तर काहींनी नवीन कपडे, विविध वस्तू खरेदीसाठी गर्दी होती.

होली रीट, बाळयेशू आणि मरिया, योसेफ यांच्या मूर्ती, नाताळ तारा, खेळणी, सांताक्लॉज, ख्रिस्मस बॉल्स, सांताक्लॉजचा पायघोळ अंगरखा, टोप्या, सजावटीचे



साहित्य बाजारपेठांसह समुद्र किनाऱ्यावर विक्रीसाठी होते. ते खरेदी करण्यात आलेले पर्यटक व्यस्त असल्याचे दिसून आले. नाताळ खरेदीवर महागाईचा काही फरक पडला नसल्याचे बाजार पेठेतील गर्दी वरून दिसत आहे.

सांताक्लॉज हे नाताळचे आकर्षण आणि लहानग्यांचे कुतूहल असल्याने सध्या सांताक्लॉजचा अंगरखा, टोपी दाढी परीधान करून लहानग्यांचे मनोरंजन होत होते. तर चर्चमध्ये नेत्रदीपक विद्युत रोषणाई करण्यात आली. तयार गोठे आणि त्यावर रोषणाई करीत ट्री सजावट साहित्य, म्युझिकल लाईट, पुतळा, नेटिव्हिटी सेट, हेअर बँड, विविध गाणी असलेली सीडी, सांताक्लॉज, तोरण, रिंग आदी वस्तूंच्या खरेदीला उत्तम प्रतिसाद मिळाला असल्याचे विक्रेते निलिमा माळी यांनी सांगितले.

पोर्तुगीज भारत देश सोडून गेले असले तरी त्यांची पुढची पिढी आजही रायगडच्या मरूड तालुक्यातील कोर्लई गावात वास्तव्यास आहे. आपल्या आगळ्या वेगळ्या नोलींग भाषेसाठी प्रसिद्ध असलेल्या या गावच्या ख्रिश्चन पाडयात ख्रिसमसचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रात्री गावातील चर्चमध्ये येशूचे स्तवन केल्यानंतर येशूच्या जन्माचा सोहळा पार पडला. चर्चवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

ख्रिसमस निमित्ताने गावात उत्साहाचे वातावरण आहे. गावातील ख्रिश्चन पाड्यात आजही आपली परंपरा जपण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रत्येक घरात सजावट करण्यात आली असून येशूच्या जन्माचा प्रसंग घराघरात देखावा स्वरूपात साकारण्यात आला आहे. केक, करंजी, डोनट अशा गोडधोड पदार्थांची मेजवानी प्रत्येक घरात तयार झाली आहे.

# मांडवा येथे मोफत नेत्रतपासणी आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती दिलिप भोईर ऊर्फ छोटमशेठ यांच्या संकल्पनेनुसार आणि संयोजनाने, 'दी लाईफ फाउंडेशन' आणि नवीन पनवेलच्या 'शंकरा आय हॉस्पिटल'च्या संयुक्त विद्यमाने धोकवडे ग्रामपंचायतींतर्गत मांडवा येथे मंगळवारी (दि. १७) मोफत नेत्रतपासणी आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरास्थळी विनामूल्य 'आयुष्मान भारत' ओळखपत्र नोंदणी शिबिरदेखील आयोजित करण्यात आले, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी दी लाईफ फाऊंडेशनचे रायगड जिल्हा समन्वयक शिलानंद इंगळे, सामाजिक कार्यकर्त्या राखी राणे, प्रणव ओव्हाळ, पनवेलच्या शंकरा आय हॉस्पिटलमधील टीम मॅनेजर विजय





बामणे, डॉ. सोनाली सुभेकर, कर्मचारी रुचिका जंगम, सोनाली पंदेरे, सागर पाटील तसेच मांडवा येथील कार्यकर्ते राजेश धुळे, गजानन पाटील, राजेंद्र कोळी, लवलेश पाटील, ओमप्रकाश किल्लेकर, गणेश कोळी, त्रिगुण पाटील दीपक कोळी, नीलेश पाटील, प्रीतम कोळी, विदेश कोळी, मनोज म्हात्रे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# पेडली केंद्राची क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत दमदार कामगिरी

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव देणे व त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला संधी प्राप्त करून देणे या हेतूने तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा ता १९ आणि २० डिसेंबर या कालावधीत अनुदानित आश्रमाशाळा वावळोली येथे मोठ्या उत्साहात झाल्या.

या स्पर्धेत पेडली केंद्राने दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांकाची पाच बक्षिसे, द्वितीय क्रमांकाची चार बक्षिसे आणि तृतीय क्रमांकाची दोन बक्षिसे



अशी एकूण ११ बक्षिसे प्राप्त केली आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, वरिष्ठ विस्तार अधिकारी नवनाथ साबळे यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

सर्व यशस्वी विद्यार्थी, शिक्षक वृंद व तालुका स्तरीय स्पर्धेत सहभागी शाळा यांचे केंद्रप्रमुख अनिल राणे यांनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मृतदेहाची ओळख पटली

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीत पाताळगंगा नदीपात्रात अनोळखी व्यक्तीचा मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असता शिळफाटा येथील साई रिव्हर हॉटेलच्या मागील नदीपात्रात अनोळखी इसमाचा मृत देह पाण्यात असल्याचे निष्पन्न झाले.



पोलीस घटनास्थळी दाखल होत संबंधित मृतदेह पाण्यात वाहून येत बुडुन मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. मृतदेह नदीपात्रातातून बाहेर काढले व तपासणी केली असता मृतदेहाच्या शर्टावर गणेश टेलर समर्थ नगर बदलापूर जि ठाणे असे असल्याने पोलिसांनी त्या दिशेने तपास करुन बदलापूर पोलिसांना संपर्क केला. हा व्यक्ती जयेश अर्जुन सिंगाडिया (५९, रा.भवानी हाईट्स पनवेल रोड, बदलापूर जि. ठाणे) हे २४ डिसेंबर २०२४ रोजी हरविले असल्याची मिसींग केस दाखल झाली होती. त्यानंसार पोलिसांनी संबंधित व्यक्तीच्या नातेवाईकांना माहिती दिली असता अनोळखी व्यक्तीचा मृतदेह जयेश सिंगाडीया यांचाच असल्याचे निष्पन्न झाले.

# कर्जतमध्ये नाताळ सण साजरा

**कर्जत : प्रतिनिधी**

नाताळ हा ख्रिश्चन धर्मीयांचा प्रमुख सण असून हा सण जगभरात साजरा केला जातो. नाताळच्या निमित्ताने चर्चमध्ये प्रार्थना सभांचे आयोजन केले जाते. गाईंच्या गोठ्यात येशूंची प्रतिमा ठेवून त्यांना नमन केले जाते. हा सण केवळ ख्रिश्चन धर्मीयांपुरता मर्यादित नसून सर्व धर्मीय एकत्र येऊन तो साजरा करतात. हा सण प्रेम, शांती, आणि आपुलकीचा संदेश देतो.



कर्जत येथील 'द श्राईन ऑफ अवर लेडी ऑफ फातिमा' या चर्चमध्ये मंगळवारी रात्री नाताळनिमित्त पवित्र प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात कॅरोल गाण्यांनी झाली. कर्जतचे धर्मगुरू जो डिमेलो यांनी ख्रिसमसच्या महत्त्वावर सखोल प्रवचन दिले. तसेच फादर ब्रायन बुतेलो, फादर सिल्व्हेस्टर रेगो, फादर बिसमार्क फर्नांडिस, फादर जिजो एसबीडी यांनीही मार्गदर्शन केले.

या वेळी अ‍ॅड. अँथनी डिमेलो, सायमन कजार, व्हिक्टर मस्केअरन्हस, सुरेंद्र अंची, सेविओ फ्रान्सिस, विल्सन पानपाटील, नेल्सन फ्रान्सिस, सेविओ कॉलासो, स्पन्सर डिसोझा, सिल्वेस्टर फ्रान्सिस, संगीता भोईर, जेम्स डिमेलो, रुबी फर्नांडिस, स्तेफी फ्रान्सिस आदी उपस्थित होते.



माणगाव : राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांनी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्राणप्रतिष्ठाण सोहळ्याला भेट देऊन आयोजकांना शुभेच्छा दिल्या. या वेळी मंत्री गोगावले यांचे मठाचे अध्यक्ष अ‍ॅड. केदार गांधी व प्रतिष्ठित व्यापारी दिनेश मेथा तसेच कार्यकारणी सदस्य यांनी स्वागत केले.

# आदिवासी बांधव उदरनिर्वाहासाठी ग्रामीण भागात डेरेदाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्याच्या डोंगराळ भागातील असणारे हजारो आदिवासी बांधव आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वासाठी पावसाळा संपल्यावर शहराच्या जवळपास काम करण्यासाठी ग्रामीण भागांमध्ये कुटुंबांसह डेरेदाखल झाले आहेत, मात्र त्यांची मुले स्थलांतरित होत असताना चार-पाच महिन्यांसाठी त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या अंतोरे मराठी शाळा येथे त्यांना प्रवेश दिला आहे.



तालुक्याच्या पांचगणी, उमरमाल, खैसा, तांबडी, जावळी निधवली डोंगरपट्टी, पाबळ कुरनाड खोरे, चांदेपट्टी वरवणे डोंगरपट्टी, कासमाल डोंगरपट्टी विभाग, दिवाणमाल, बांगरवाडी, वेताळपट्टी यासह इतर डोंगराळ भागातील आदिवासी बांधवांना पावसाळ्यात त्या ठिकाणी भाजीपाला यासह विविध लागवड करून आपली उपजीविका भागवत असतात मात्र पावसाळ्यानंतर हिवाळा आणि उन्हाळ्याच्या दरम्यान हाताला काम मिळण्यासाठी या डोंगरावर भागातील हजारो आदिवासी कुटुंब शहराच्या अगदी लगत असणाऱ्या ग्रामीण भागात येऊन आपल्या कुटुंबासह डेरेदाखल होतात.

यामध्ये म्हाडा कॉलनी, अंतोरा फाटा, बोरगाव रोड, महाडिक वाडी या भागामध्ये छोटीशी झोपडी बांधून त्या ठिकाणी चार-पाच महिन्यांसाठी स्थलांतरित होऊन आपल्या कुटुंबासह ते दररोज कामकाजाच्या शोधात असताना पेण शहरांमध्ये सुरू असलेल्या बांधकामांवर मोलमजुरीचे काम करतात तर काही तरुण जेष्ठ नागरिक ग्रामीण भागातील वाढणाऱ्या मोठमोठ्या झाडांना तोडण्याचे काम करून त्यामधून त्यांना मिळणाऱ्या रोजच्या मोबदल्यातून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतात मात्र यामुळे त्यांच्या मुलांचे शैक्षणिक वर्ष वाया जात असल्याने राज्य शासनाने आशा स्थलांतरित मुलांना विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेमध्ये प्रवेश देऊन इतर विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टिकोनातून शिक्षकांनी काम केले पाहिजे या आदेशामुळे स्थलांतरित विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेमध्ये प्रवेश दिला जात आहे, मात्र यादरम्यान आपल्या हाताला काम मिळण्यासाठी डोंगराळ भागातील हजारो आदिवासी बांधव ग्रामीण भागाच्या परिसरात आपल्या कुटुंबासह डेरेदाखल झाले आहेत.

डोंगराळ भागातील आदिवासी बांधव पावसाला संपतात हिवाळ्याच्या दरम्यान आपल्या मुलाबाळांना घेऊन कुटुंबाच्या कुटुंब पेणच्या आजूबाजूच्या परिसरात वास्तव्याकरीता येतात मात्र यादरम्यान त्यांच्या मुलांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये याकरिता शासनाच्या आदेशानुसार अशा स्थलांतरित मुलांचा सर्व्हे करावा मुख्याध्यापक महेंद्र बैकर, सहाय्यक शिक्षक राजेंद्र पाटील यांनी नुकतेच केला असून स्थलांतरित झालेल्या पांचगणी येथील सहा- सात विद्यार्थ्यांना अंतोरे मराठी शाळेत प्रवेश दिला आहे.



माणगाव : राज्याच्या महिला व बालविकास खात्याच्या मंत्रिपदी पुन्हा निवड झाल्याबद्दल आदिती तटकरे यांचे मोर्बा येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, अल्पसंख्याक सेलचे श्रीवर्धन अध्यक्ष अल्ताफ धनसे, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर, माजी उपसरपंच इकबाल हर्णे कर, नजीर धनसे, शादाब गैबी, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, माजी नगरसेवक सिराज परदेशी व सहकारी यांनी अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ऑस्ट्रेलियाची त्रिशतकी मजल

## पहिल्या दिवशी ६ बाद ३११ धावा




**मेलबर्न : वृत्तसंस्था**

मेलबर्नच्या मैदानात सुरू असलेल्या बॉक्सिंग डे कसोटीच्या पहिल्या दिवशी आघाडीच्या फळीतील फलंदाजांनी केलेल्या चार अर्धशतकांच्या जोरावर ऑस्ट्रेलिया संघाने पहिल्या दिवशी ६ बाद ३११ धावांपर्यंत मजल मारली आहे. दरम्यान, भारतासाठी वेगवान गोलंदाज बुमराह पुन्हा एकदा धावून आला.

बॉर्डर-गावसकर ट्रॉफी स्पर्धेतील पाच सामन्यांच्या कसोटी चौथ्या कसोटी सामन्यात पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीवीरांनी तगडी सुरुवात करुन देत कॅप्टनचा निर्णय सार्थ ठरवला. मेलबर्नच्या मैदानातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या १९ वर्षीय सॅम कॉन्स्टास याने पहिल्या सेशनमध्ये हवा केली. त्याने ६५ चेंडूत ६० धावांची दमदार खेळी करताना सहा चौकार आणि दोन षटकार मारले. खासकरून त्याने बुमराहच्या गोलंदाजीवर आक्रमक अंदाजात केलेल्या बॅटिंगमुळे तो अधिक चर्चेत राहिला. रवींद्र जडेजाने त्याला पायचित करत संघाला पहिले यश मिळवून दिले.

ऑस्ट्रेलियाच्या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी ८९ धावांची भागीदारी रचली. पहिली विकेट पडल्यावर सलामीवीर उस्मान ख्वाजा आणि मार्कस लाबुशेन ही जोडी जमली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी केली. ही जोडी बुमराहने फोडली. उस्मान ख्वाजाने १२१ चेंडूत सहा चौकाराच्या मदतीने ५७ धावा केल्या. त्यानंतर मार्नस लाबुशेन याने स्टीव्ह स्मिथसोबत डावाला आकार दिला. ही जोडीही टीम इंडियासाठी डोकेदुखी ठरताना दिसली, पण वॉशिंग्टनच्या गोलंदाजीवर पुढे येऊन फटका मारण्याच्या नादात लाबुशेन फसला. तो १४५ चेंडूत संघाच्या धावसंख्येत ७५ धावांची भर घालून माघारी फिरला. स्मिथच्या साथीने त्याने तिसऱ्या विकेटसाठी ८३ धावांची भागीदारी केली. तो बाद झाला त्या वेळी ऑस्ट्रेलियाच्या धावफलकावर ३ बाद ३३७ अशी धावसंख्या होती.

ऑस्ट्रेलिया संघ तीन विकेट्स गमावल्यानंतर मजबूत स्थितीत असताना जसप्रीत बुमराह पुन्हा टीम इंडियाच्या मदतीला धावला. त्याने ट्रॅविस हेडला खातेही न उघडता तंबूत धाडले. एवढेच नाही तर त्याची जागा घेण्यासाठी आलेल्या मिचेल मार्शलाही त्याने अवघ्या चार धावांवर तंबूचा रस्ता दाखवला. आकाश दीपने ॲलेक्स कॅरीच्या ३१ (४१) रुपात भारतीय संघाला सहावे यश मिळवून दिले, पण दुसऱ्या बाजूला स्टीव्ह स्मिथ पहिल्या दिवसाअखेर फिफ्टी करून नाबाद परतल्यामुळे ऑस्ट्रेलियाचे पारडे जड ठरले.

पहिल्या दिवसाअखेर ऑस्ट्रेलियाने ६ बाद ३११ धावा केल्या. स्टीव्ह स्मिथ १११ चेंडूचा सामना करून ६८ धावांवर नाबाद आहे. दुसऱ्या बाजूला पॅट कमिन्स १७ चेंडूत आठ धावांवर खेळत होता.



# अलिबाग तालुका अजिंक्यपद कुस्ती निवड चाचणी स्पर्धा उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुका अजिंक्यपद कुस्ती निवड चाचणी स्पर्धा वाडगाव येथील सुनील तटकरे कुस्ती प्रशिक्षण केंद्रात नुकतीच मोठ्या उत्साहात झाली. तालुक्यातील अनेक गावच्या कुस्तीपटूंनी या निवड चाचणी स्पर्धेत सहभाग घेत प्रतिसाद दिला.

अलिबाग तालुका कुस्तीगीर संघटना व वाड-गाव हनुमान तालीम संघ यांच्या विद्यमाने घेण्यात आलेल्या या स्पर्धेचा शुभारंभ सरपंच सारिका पवार व माजी सरपंच सीताराम भगत यांच्या हस्ते झाला.

स्पर्धेस तालुका कुस्तीगीर संघटना अध्यक्ष जयेंद्र भगत, कार्याध्यक्ष रवींद्र घासे, उपाध्यक्ष कृष्णा भोपी, सचिव प्रसाद भगत, खजिनदार वैभव मुकादम, सहसचिव विलास पाटील, हनुमान तालीम संघ अध्यक्ष चंद्रकांत थळे, उपाध्यक्ष गोपीनाथ ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य निलम थळे, रूपाली पाटील, अंजली भगत, प्रमिला खुले, संजना नाईक, माजी उपसरपंच प्रसाद पाटील व कुस्तीप्रेमी लोक उपस्थित होते.

स्पर्धा सब विविध वयोगटात व प्रकारात खेळविण्यात आली. स्पर्धेचे सूत्रसंचालन व समालोचन प्रमोद भगत यांनी केले, तर पंच म्हणून वैभव मुकादम, सुधाकर पाटील, प्रसन्ना पाटील, जितेंद्र गावंड, यतिराज पाटील यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या शेवटी गुणवंत मल्लांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.



# पडसरे आश्रमशाळेचे क्रीडा स्पर्धेत यश

**पाली : प्रतिनिधी**

आदिवासी विभागाच्या प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा शासकीय आश्रमशाळा पिंगळस कर्जत या ठिकाणी झाल्या. या स्पर्धेत जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात पडसरे आश्रमशाळेने उत्तम कामगिरी करत अनेक बक्षिसांची कमाई केली.

या स्पर्धेत पडसरे आश्रमशाळेने मुलींच्या कबड्डी, रिले ४*१००, गोळाफेकमध्ये त प्रथम क्रमांक, लांब उडी, २०० मीटर धावणे, पाच हजार मीटर चालणेमध्ये द्वितीय आणि उंच उडीत तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रशिक्षक अनिल साजेकर तसेच शिक्षक राजू मोरे, दिपाली घरट, जानू दोरे, मंगेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी यशस्वी कामगिरी केली.

या यशाबद्दल कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ पालीचे अध्यक्ष रवींद्र लिमये तसेच माध्यमिक मुख्याध्यापक संदीप शिंदे, प्राथमिक मुख्याध्यापिका मीनाक्षी ढोपे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# मुंबईने उडवला अरुणाचलचा धुव्वा

**मुंबई : प्रतिनिधी**

विजय हजारे ट्रॉफीच्या या मोसमाच्या तिसऱ्या टप्प्यातही मुंबई संघ उत्कृष्ट कामगिरी करीत आहे. मुंबई संघाने कर्णधार बदलला असतानाही अरुणाचल प्रदेशविरूद्धच्या सामन्यात एकतर्फी विजय नोंदवला.

या सामन्यात श्रेयस अय्यरच्या जागी मुंबईचे नेतृत्व शार्दुल ठाकूरकडे होते. शार्दुलच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या गोलंदाजांनी विरोधी संघाला केवळ ७३ धावांत गुंडाळले आणि त्यानंतर ३३ चेंडूत ७७ धावा करून सामना नऊ विकेटने सहज सामना जिंकला.

# क्रिकेट स्पर्धेत रोहा संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २३ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रोह्याच्या दिशा अकॅडमीने विजेतेपद पटकाविले.



पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात दिशा क्रिकेट अकॅडमी रोहा संघाने न्यू पनवेल क्रिकेट अकॅडमी संघावर चार गडी राखून विजय मिळवला आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारलेल्या न्यू पनवेल संघाने ३६.५ षटकांमध्ये सर्व गडी गमावत १५९ धावा केल्या होत्या. त्यामध्ये क्रिश शेटचे याने सर्वाधिक ३९ धावा, तर साहिल देसाई २४ व प्रथमेश राणेने १९ धावांचे योगदान दिले. रोहा संघाकडून साहिल लहाने याने चार, आदित्य साळवेने तीन व रितेश नलावडेने दोन गडी बाद केले.

१६० धावांचे लक्ष्य रोहा संघाने सहा गडी गमावत ३०व्या षटकात पूर्ण केले. सलामवीर आर्यान देशमुख याने २८, आयुष माळी २५ व श्रेयस कुमार २५, तर मिहिर भाटकरने २५ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला. न्यू पनवेल संघाकडून मिलन चौरसियाने भेदक गोलंदाजी करत चार फलंदाज तंबूत धाडून सामन्याला रंगात आणली. हर्ष सिंह व आदित्य ढवळे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

अंतिम सामन्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, पेण स्पोर्टस् असोसिएशनचे अध्यक्ष अरुण शिंदे, सदस्य ॲड. पंकज पंडित, प्रशिक्षक कमिटीचे अध्यक्ष शंकर दळवी, रोहा संघाचे प्रशिक्षक सुरेंद्र भातिकरे, न्यू पनवेल संघाचे प्रशिक्षक सुरेश म्हात्रे, राजेश शिंदे, पंच सुयोग चौधरी, रोहन पाटील, आदेश नाईक यांच्यासह खेळाडू व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

# अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

महर्षी दयानंद स्पोर्टस्, जिजामाता महिला संघ यांनी मुंबई शहर कबड्डी असोसिएशनने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या १४ वर्षाखालील मुलींच्या गटात विजयी सलामी दिली. पुरुष द्वितीय श्रेणी गटात सूर्यकांत मंडळ, भवानी माता प्रतिष्ठान, ओम् ज्ञानदीप यांनी दुसरी फेरी गाठली.



वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर सुरू झालेल्या या स्पर्धेत महर्षी दयानंद स्पोर्टस्ने अमर सेवा मंडळावर २२-२० अशी मात केली. आक्रमक सुरुवात करीत लोण देत महर्षी दयानंदने पहिल्या डावात १३-०२ अशी मोठी आघाडी घेतली, पण दुसऱ्या डावात अमरने त्यांना विजयासाठी चांगलेच झुंजविले. शेवटी दोन गुणांनी महर्षी दयानंदने सामना आपल्या बाजूने झुकविला. रोहिणी कदम, कार्तिका घोलप यांच्या पहिल्या डावातील झंझावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. दुसऱ्या डावात अमरच्या नेहा कदम, सिद्धी शेगर यांनी आपला खेळ गतिमान करीत सामन्यात रंगत आणली, मात्र संघाला विजयी करण्यात त्या कमी पडल्या. दुसऱ्या सामन्यात जिजामाता महिला संघाने पूर्वार्धातील १३-२१ अशा पिछाडीवरून गोलफादेवी प्रतिष्ठानचा प्रतिकार ४१-३९ असा मोडून काढला.

सेजल मालप, सिया निकम यांच्या उत्तरार्धातील तुफानी खेळाला जिजामाता संघाच्या विजयाचे श्रेय जाते. गोलफादेवीच्या अवनी धुमाळ, स्वराली पाटील यांचा पूर्वार्धातील जोश उत्तरार्धात अगदीच दुबळा पडला.

पुरुषांच्या द्वितीय श्रेणी गटातील चुरशीच्या लढतीत सूर्यकांत क्रीडा मंडळाने विजय बजरंग सेवा मंडळाला २९-२८ असे चकवित आगेकूच केली. विश्रांतीला १२-१४ अशा दोन गुणांनी पिछाडीवर पडलेल्या सूर्यकांतने नंतर आपला खेळ उंचावत विजय आपल्या खिशात टाकला. आयुष आशे, अनिल सालपेकर यांच्या चढाई पकडीच्या दमदार खेळाला याचे श्रेय जाते. विजय बजरंगच्या ओंकार नेमण, प्रणव नेवरेकर यांचा खेळ विश्रांतीनंतर कमी पडला.

भवानी माता प्रतिष्ठानने शर्थीच्या लढतीत दादोजी कोंडदेव स्पोर्टस्चे आव्हान ३२-३१ असे मोडून काढले. मध्यांतराला १६-१७ अशा पिछाडीवरून भवानी माताने विजयाची किमया साधली. सुशांत धावडे, निखिल पाल भवानी माताकडून, तर अमर कदम, संदेश पोवार दादोजी कोंडदेवकडून उत्कृष्ट खेळले. याच गटात ओम् ज्ञानदीपने अभिनवनगर चाळ कमिटीला २८-२३ असे नमवित दुसरी फेरी गाठली. पूर्वाधात १४-०८ अशी आघाडी ओम् ज्ञानदीप संघाकडे होती. दर्शन पेरीगारम, जतिन गुरव यांनी या विजयात महत्वपूर्ण खेळ केला. अभिनवनगरचे सोहम लेपकर, प्रथमेश पडवळ चमकले.

# कुमार-कुमारी गट राज्य निवड चाचणी कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड विरुद्ध पालघर, यजमान सांगली विरुद्ध उस्मानाबाद या कुमारी गटाच्या उद्घाटनीय सामन्यांबरोबरच अन्य चार सामन्यांनी सांगलीच्या सांगलवाडी येथील ५१व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला प्रारंभ होईल. या स्पर्धेचे उद्घाटन २८ डिसेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असोसिएशनने युवक मराठा क्रीडा संस्था यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. गत वर्षापासून या स्पर्धेत सहा संघांची वाढ केल्याने सहभागी होणाऱ्या ३१ संघांची आठ गटात विभागणी करण्यात आली आहे.

सांगली येथील चिंचबाग मैदानावर होणारी ही स्पर्धा मातीच्या सहा क्रीडांगणावर खेळविण्यात येणार आहे. सामने सकाळ व सायंकाळ या दोन्ही सत्रात होतील. या स्पर्धेची गटवारी राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी जाहीर केली आहे.

कुमारी (मुली) - अ गट : पिंपरी-चिंचवड, नाशिक शहर, पालघर; ब गट : पुणे ग्रामीण, सोलापूर, पुणे शहर, औरंगाबाद; क गट : मुंबई उपनगर पूर्व, ठाणे ग्रामीण, जळगाव, जालना; ड गट : कोल्हापूर, धुळे, नाशिक ग्रामीण, हिंगोली; इ : मुंबई उपनगर-पश्चिम, परभणी, नंदुरबार, नांदेड; फ गट : सांगली, मुंबई शहर पूर्व, बीड, उस्मानाबाद; ग गट : अहमदनगर, रायगड, सातारा, लातूर; ह गट : सिंधुदुर्ग, मुंबई शहर पश्चिम, ठाणे शहर, रत्नागिरी.

कुमार (मुले) - अ गट : मुंबई उपनगर पश्चिम, पुणे शहर, मुंबई शहर पश्चिम; ब गट : पिंपरी-चिंचवड, सातारा, अहमदनगर, औरंगाबाद; क गट : पुणे ग्रामीण, जळगाव, लातूर, नाशिक ग्रामीण; ड गट : नंदुरबार, ठाणे शहर, नांदेड, सिंधुदुर्ग; इ गट : मुंबई उपनगर पूर्व, जालना, रत्नागिरी, सोलापूर; फ गट रायगड, पालघर, बीड, उस्मानाबाद; ग गट : कोल्हापूर, परभणी, हिंगोली, धुळे; ह गट : सांगली, ठाणे ग्रामीण, नाशिक शहर, मुंबई शहर पूर्व.

# विराट आणि सॅम कॉन्स्टास यांच्यात धक्काबुक्की

## पंचांसह खेळाडूला करावी लागली मध्यस्थी







**मेलबर्न : वृत्तसंस्था**

मेलबर्नमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉक्सिंग डे कसोटीला सुरुवात झाली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पदार्पणवीर सॅम कॉन्स्टास आणि भारताचा अनुभवी खेळाडू विराट कोहली यांच्यात बाचाबाची पाहिला मिळाली, ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

ऑस्ट्रेलियाच्या डावातील दहाव्या षटकानंतर मेलबर्न क्रिकेट मैदानावरील वातावरण तापले. खेळपट्टीच्या मध्यभागी विराट कोहली आणि सॅम कोन्स्टॅस यांची टक्कर झाली. यानंतर दोन्ही खेळाडूंमध्ये वाद सुरू झाला. प्रकरण शांत करण्यासाठी ऑस्ट्रेलियाचा दुसरा सलामीवीर उस्मान ख्वाजासह पंचांना हस्तक्षेप करावा लागला. कॉन्स्टास ६० धावांची खेळी करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

दरम्यान, क्रिकबझच्या रिपोर्टनुसार आयसीसीने विराटला त्याच्या मॅच फीच्या २०% दंड ठोठावला आहे. रिपोर्ट्सनुसार विराट कोहली लेव्हल १ गुन्ह्यांतर्गत दोषी आढळला आहे. ही दिलासा देणारी बाब आहे की विराट कोहलीला फक्त एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला आहे, त्यानुसार त्याला पुढील सामन्यात निलंबित केले गेले नाही.





**पनवेल :** श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे यंदा ११वे वर्ष असून त्या अंतर्गत रायगड केंद्राची प्राथमिक फेरीचा शुभारंभ बुधवारी झाला. खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात झालेल्या या प्राथमिक फेरीला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन कलाकारांसोबत संवाद साधून शुभेच्छा दिल्या. या वेळी नाट्य परिषद पनवेल शाखेचे कार्यवाह श्यामनाथ पुंडे, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, गणेश जगताप, अमोल खेर, प्राथमिक फेरीचे परीक्षक आशीर्वाद मराठे, मानसी मराठे, प्रशांत सदावर्ते आदी उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com